साठीची वेस
ओलांडणारे
कवी बोरकर

माझी श्रद्धा
आहे की
I am a man
of destiny.
माझं महात्मायन
पुरं झालं की
काश्मीर ते
कन्याकुमारी
माझं नाव
गाजेल.



आयुष्यात essentials असतात
आणि non-essentials असतात.
पैकी आयुष्यातल्या उच्च बाबींवर
तडजोड करू नये.
शुद्ध अभिजात कविता
हे माझ्या आयुष्यातलं
essential आहे.
तिथं मी कालत्रयी
तडजोड करणार नाही
केली नाही.


# माणूस

बुधवार
२ डिसेंबर
१९७०
चाळीस पैसे

बुधवार, २ डिसेंबर १९७०

# माणूस

| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
|---|---|---|
| अंक : चाळीसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे |

| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
|---|---|---|
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

'माणूस'चा दिवाळी अंक वाचला व बरीचशी निराशा झाली. त्यातील मुख्य तीन आकर्षणांपैकी दोन तर अक्षरशः फुसकीच ठरली.

सुप्रसिद्ध लेखक बाबासाहेब पुरंदरे यांची म्हणून प्रथम वाचावयास घेतलेली गोष्ट (?) 'संथ प्रवरा वहात होती' अक्षरशः निरर्थक वाटली आणि गो. नी. दांडेकर यांच्या भाकडया प्रवासवर्णनाने (कुणा एकाची भ्रमणगाथा) नेहमीसारखी निष्कारणच जास्त जागा व्यापली आहे व आपल्या दिवाळीच्या आनंदात विरजण पडल्यासारखे झाले.

अर्थात एक प्रामाणिक वाचक म्हणून श्री. अरुण गोसावी यांचा 'यादवी' लेख मात्र भरपूर करमणूक करून गेला व निश्चितच बोधप्रद वाटला. त्याबद्दल त्यांचे खास अभिनंदन.

१६ नोव्हेंबर, १९७० — अशोक देशपांडे, वालचंदनगर

मुखपृष्ठ मांडणी : देवीदास बागूल

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

भगवा ध्वज, कोयता–हातोडा वगैरे....

# स्वत्व हवे अंतर्बाह्य परिवर्तनही हवे

श्री. ग. मा.

दिवाळीच्या प्रदीर्घ सुटीनंतर निघत असलेल्या या पहिल्याच अंकात ' हिंदू समाजवादी ' यांचा एक लेख प्रसिद्ध होत आहे. हा लेख खळबळजनक ठरेल की नाही सांगता येत नाही. हिंदुत्ववादी किती जागरूक आहेत यावर हे अवलंबून आहे. परंतु अनेक हिंदुत्वप्रेमी लोकांच्या मनात खदखदत असलेल्या खळबळीचा, असंतोषाचा हा एक आविष्कार आहे, यावर आज नाही उद्या हिंदू समाजाचे, विशेषत: त्यातल्या तरुण पिढीचे नेतृत्व करू पाहणाऱ्या पक्षांनी, संघटनांनी विचार केला पाहिजे यात काही शंका नाही. लेखक मराठवाड्यातील एक प्राध्यापक आहेत. दिवाळीपूर्वीच हा लेख माणूसकडे त्यांनी पाठवून दिला होता–' रोखलेल्या बंदुका, उठलेली जनता ' ही माणूसमधून त्यासुमारास येणारी लेखमाला याला कारणीभूत ठरली की काय न कळे. पण हा लेख आताच प्रसिद्ध होण्यात विशेष औचित्य साधले जात आहे. कारण या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच पुणे येथे महाराष्ट्र जनसंघाचे अधिवेशन आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातीलच नव्हे, भारताच्या इतर भागातील हिंदुत्ववादी कार्यकर्तेही एकत्रित येतील, काही विचारविमर्श–चर्चा

साहजिकच सर्वत्र चालू राहील. अशावेळी लेखाचा उपयोग होण्याची त्यातल्या त्यात खूप शक्यता असते.

लेखाचा भडक मथळा सोडला तर त्यातील मुख्य प्रतिपादन असे दिसते. देशात हिंदूंच्या हितकर्त्या पक्षाची अवश्यकता आहे. चालू परिस्थितीत जनसंघ हा एकच पक्ष ही भूमिका वठवू शकतो. पण जनसंघाचे राजकारण नकारात्मक व मुस्लीम द्वेषावर आधारलेले आहे. शिवाय राजेमहाराजे, जमीनदार, जहागिरदार व इतर उच्चवर्णीय या हिंदु समाजातील अत्यल्प गटाचीच पाठराखण जनसंघ करीत असल्याने नंग्याभूक्या, गोरगरीब, बहुसंख्य हिंदू समाजाला या पक्षाविषयी आपुलकी वाटत नाही. मुस्लीम संकटाच्या प्रतिकारासाठीसुद्धा दलित व शोषित जनतेचे सघटन पाठिशी असणारा समतावादी हिंदुत्वनिष्ठ पक्षच अवश्य आहे.


'हिंदू समाजवादी' यांच्या प्रतिपादनावर सावरकरांच्या विचारसरणीची छाप स्पष्ट दिसत आहे. परंतु सावरकरांच्या भूमिकेतील एक उणीव, एक अंतर्विरोध लेखकाने ध्यानात घेतलेला दिसत नाही. सावरकरांनी 'हिंदू' शब्द पारलौकिक धर्मापासून अलग करून त्याचा संबंध ऐहिक राष्ट्रवादाशी, भूमीनिष्ठेशी, 'हिंदी-पणाशी' जोडण्याचा प्रयत्न आपल्या सुप्रसिद्ध व्याख्येत केला. परंतु परंपरेने या शब्दाची परलोकवाचक 'धर्म' या कल्पनेशी घातलेली सांगड अद्याप तरी सुटू शकलेली नाही. हिंदुस्थानातील बहुसंख्य जनता व सारे जग हिंदू हा शब्द धर्माशीच एकरूप समजत चालले आहे. हिंदू म्हटल्यावर हिंदुस्थानात राहणारा, या भूमीशी एकनिष्ठ असणारा नागरिक, एवढेच फक्त चित्र डोळ्यासमोर येत नाही. वेदोपनिषदे-गीता यांना मानणारा, वर्ण-जात या नात्याने परस्पराशी संबधित असणारा समाज 'हिंदू' या शब्दाने आजही ध्वनित होतो. यामुळे शीख, बौद्ध हे जवळचे समाजही 'हिंदू' म्हणवून घेण्यास खळखळ करतात तर मुसलमान, ख्रिश्चन समाजाची याला मान्यता लाभेल व ते आपल्याला 'हिंदी' ऐवजी 'हिंदू' राष्ट्रीय म्हणवून घेण्यास तयार होतील हा संभव कमी आहे. ही वस्तुस्थिती सावरकरांनीही शेवटी शेवटी पत्करलेली असावी. एरव्ही 'धर्मांतर हे राष्ट्रांतर' या त्यांच्या घोषणेची संगती लागत नाही. धर्म कोणताही असो, तो बदलला तरी राष्ट्रनिष्ठा अबाधित, ही राष्ट्रवादाची प्रतिज्ञा असते. म्हणून ख्रिस्तीधर्म एकच असला तरी ख्रिस्ती राष्ट्रे अनेक झाली व त्या परस्परात महायुद्धेही घडली. राष्ट्रवादाची ही ऐहिक बैठक स्वीकारली तर धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरू शकत नाही. तरीही आपल्याकडे धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरत असले तर हिंदुत्व व हिंदुधर्म अभिन्न मानावा लागतो व राष्ट्रनिष्ठा व्यक्त करण्यासाठी अधिक व्यापक व सर्वसमावेशक असा दुसरा एखादा सर्वमान्य शब्द योजणे, रूढ करणे अधिक सूज्ञपणाचे ठरते. हा सूज्ञपणा जनसंघ संस्थापकांनी दाखविलेला दिसतो. जनसंघ सर्व भारतीयांसाठी आहे, केवळ हिंदूसाठी नाही. निदान जनसंघाची प्रतिज्ञा तशी आहे. मुस्लिमद्वेषाचा आक्षेप

घ्यायचाच तर तो हिंदूसभेवर, सावरकरभूमिकेवर घेता येईल. जनसंघावर तो घेणे अन्यायाचे आहे. 'राजकारणाचे हिंदूकरण' (Hindooise politics) ही सावरकरांची घोषणा होती-जिच्यातून मुसलमान, ख्रिश्चन या अहिंदू समाजाला निश्चितच वगळले गेलेले होते. एकात्म राष्ट्रनिर्मितीसाठी या समाजांचा सहभागही अवश्य आहे आणि हिंदुत्व = हिंदुधर्मीयत्व हे व्यवहारातले समीकरणही अटळ आहे. यासाठी 'हिंदूकरण' घोषणेचा जनसंघाने त्याग केला, 'भारतीयकरण' हा सर्वमान्य होऊ शकणारा पर्याय स्वीकारला. हिंदी राष्ट्रवादाचाच हा संस्कृतप्रचुर आविष्कार तत्वत: तरी मानला पाहिजे. व्यवहारात जनसंघ हिंदूहितकर्ता ही प्रतिमा धारण करतो हे काही अंशी खरे आहे. कार्यकर्त्यांचे पूर्वसंस्कार, हिंदूंचे संख्याधिक्य, विरोधकांचा प्रचार या सर्वांचा हा परिणाम असू शकतो. अगदी गांधी-नेहरूंच्या कॉंग्रेसला नाही का जिना 'हिंदू कॉंग्रेस' म्हणत होते? मधोकगटाचे प्राबल्य वाढत गेले तर मात्र ही 'हिंदू प्रतिमा' अधिकच गडद होईल, शब्द 'भारतीयकरण' असला तरी अर्थ 'हिंदूकरण'च राहील यातही काही शंका नाही. पण मग तो श्यामाप्रसादांचा, दीनदयालांचा जनसंघ असणार नाही, हिंदूसभेचेच ते रूपांतर असेल. म्हणजेच मुस्लीमद्वेषाची भूमिका अधिक धारदार व कडवी बनलेली असेल. 'हिंदू समाजवादी' यांना हे तर व्हायला नको आहे. मग जनसंघाच्या भारतीयकरण घोषणेचे त्यांनी एवढ्यापुरते स्वागत का करू नये? सावरकरांच्या कठीण दगडापेक्षा जनसंघाची ही मऊ वीटच त्यांनी वास्तविक स्वीकारायला हवी आहे.

अर्थात मुस्लीम जातीयतेच्या चालू उठावाला कुठलीही प्रतिगामी संघटना, मग ती अगदी शुद्ध भारतीय असली तरी, थोपवू शकणार नाही हा 'हिंदू समाजवादी' यांच्या लेखातील मुख्य विचार मात्र तथ्यपूर्ण आहे. समाजवादाला जनसंघाचा विरोध आहे. कम्युनिझम द्वेषाची तर अलीकडे त्याला कावीळच झाल्यासारखी दिसते. राष्ट्रवादी विरुद्ध कम्युनिस्ट असली खोटी द्वंद्वे जनसंघ लोकांसमोर उभी करून आपली वाढ करू पाहतो. हे सारे निःसंशय खेदजनक आहे. या विचारधारा 'परकीय' आहेत म्हणून जनसंघाचा यांना विरोध आहे असली जनसंघनेत्यांची विधाने तर हास्यास्पदच समजली पाहिजेत. रेल्वे, आगबोट या गोष्टी जितक्या परकीय आहेत, तितकाच राष्ट्रवादही परकीय आहे. औद्योगिक क्रांतीनंतरच्या या विचारप्रणाली आहेत. यातला राष्ट्रवादाचा पहिला टप्पा स्वकीय, भारतीय व पुढचा समाजवाद हा टप्पा परकीय–अभारतीय या समजुतीला काही अर्थ नाही. प्रश्न फक्त हे विचार ग्रहण करताना त्यांना आपला वैशिष्ट्यपूर्ण आकार कसा द्यायचा, भारतीय अस्मितेशी त्यांची बेमालूम सांगड कशी घालायची एवढाच असतो. असा प्रयत्न करण्याचे सोडून 'परकीय' 'परकीय' म्हणून समाजवादाला आंधळा

विरोध करण्याने जनसंघ जैसेयेवाल्यांच्या, जहागिरदार–संस्थानिकांच्या कळपात अधिकाधिक ढकलला जातो, मनाने समाजवादी असलेल्या तरुण पिढीच्या अंतःकरणापासून दुरावतो याची जनसंघ नेत्यांनी पुरेशी दखल घेतल्याचे दिसत नाही. ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे. बापू गोखले कितीही शूर व स्वाभिमानी असला तरी मराठेशाही तो वाचवू शकला नाही. इंग्रजी सत्तेची मर्मस्थाने ध्यानात घेऊन अंतर्बाह्य नव्या स्वरूपात उभे राहण्याची अवश्यकता त्या पिढीने नाकारली हा पुढील पराभवाचा अर्थ आहे. स्वाभिमानही हवा, अंतर्बाह्य परिवर्तनाची सिद्धताही हवी. बँक राष्ट्रीयकरण असो, भूमिमुक्ती आंदोलन असो किंवा पूर्वी पकडलेले व आता सोडलेले गायीचे शेपूट असो– या व अशा स्वरूपाच्या प्रत्येक प्रश्नावर जनसंघाने कमालीची प्रतिगामी भूमिका घेतलेली आहे. परळच्या परवाच्या निवडणुकीत तर जनसंघाने एक पाऊल आणखी मागे टाकण्याचा विक्रम करून समाजवादी तरुण मनाला जबरदस्त धक्काच देऊन ठेवला आहे. या मार्गाने जनसंघाची भावी वाटचाल होणार असेल तर इतर आशियाई देशात घडले ते येथे घडल्याशिवाय राहणार नाही, हा 'हिंदू समाजवादी' यांनी दिलेला इशारा रास्त वाटतो. जवळजवळ पंचवीस वर्षे चीनमध्ये चँग-कै-शेक राष्ट्रवादी भावनांना आवाहन करून सत्ता टिकवू पाहत होता. कम्युनिस्टांचा उल्लेख 'देशद्रोही' म्हणून सुद्धा नाही, चक्क 'दरोडेखोर' ( Bandit ) म्हणून करण्यास तो व त्याची सर्व प्रभावळ कधी चुकली नाही. इतिहास काय घडला ? राष्ट्रवादी विरुद्ध कम्युनिस्ट अशी ध्रुवीकरणाची भाषा जनसंघ बोलतो ती चूक आहे. हे असे ध्रुवीकरण व्हावे ही तर कम्युनिस्टांची इच्छा असते. मार्क्सचे वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान अचूक असल्याचा हा ढळढळीत पुरावाच त्यांना उपलब्ध होतो व पुढचा मार्ग सरळ सापडतो. भारतीय प्रतिभा जर काही असेल, तर ती असे सरळसोट ध्रुवीकरण टाळण्यात आहे. जनसंघ लोकशाही मानतो आणि लोकशाहीची कसोटी ध्रुवीकरण टाळण्यातच असते. लोकशाहीची चौकट कायम ठेवून आर्थिक–सामाजिक न्याय अखेरच्या भारतीयाला मिळवून देण्याचा काही पर्याय जनसंघाजवळ आहे काय ? हा न्याय चालू स्थितीत बहुसंख्य भारतीयांना मिळेनासा झाला आहे आणि जनसंघ ही स्थिती बदलू पाहणाऱ्या शक्तींच्या आंधळ्या विरोधात उभा आहे. मुस्लिम जातीयतेच्या उद्रेकाबरोबर जनसंघ वाढल्यासारखा दिसतो हे खरे आहे. पण ही सूज आहे, परिस्थिती निवळताच ती ओसरेलही. परिणामकारक, निरोगी व टिकाऊ वाढीसाठी राष्ट्रवादी विचारांबरोबरच जनसंघाला समतावादी विचारांचीही कास धरावी लागेल हे निश्चित आहे. जनसंघ हे नाकारील तर जनताही जनसंघाला नाकारल्याशिवाय राहणार नाही. विळा-हातोडा भगव्या ध्वजावर चढवून 'हिंदू समाजवादी' यांनी हे सत्य अति कडकपणे सांगितले, एवढाच त्यांच्यावर फार तर या संदर्भात आक्षेप घेता येईल.

◻



# भगव्या ध्वजावर कोयता - हातोडा !

हिंदु समाजवादी

जनसंघाने भारतीयकरणाची घोषणा केल्यानंतर सगळीकडे प्रचंड खळबळ उडाली.

जनसंघाची ही घोषणा भारतातील मुस्लिमांना संबोधित आहे ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे. राजकीय रंगभूमीवर जनसंघ हा हिंदुत्वनिष्ठ पक्ष समजला जातो. निदान तो हिंदूंच्या हितरक्षणासाठी बद्धपरिकर आहे असे तरी सांगितले जाते.

आपल्या देशात एखाद्या हिंदूवादी पक्षाची आवश्यकता आहे काय व तसे असल्यास जनसंघ ती भूमिका बजावण्यास पात्र आहे काय असे दोन प्रश्न उपस्थित होतात. माझ्या मते पहिल्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी तर दुसऱ्याचे उत्तर नकारार्थी आहे

हिंदूंच्या रक्षणासाठी जनसंघ पात्र नाही हे विधान बरेचजणांना चमत्कारिक वाटेल. या विधानाच्या सिद्धतेसाठी त्या पक्षाच्या धोरणाची चिकित्सा करावी लागेल.

जनसंघ आज हिंदूंचा रक्षणकर्ता का समजला जातो तर त्याच्या प्रखर मुस्लिम-विरोधामुळे. आजकाल आपण मुस्लीमविरोधी नसून ‘ राष्ट्रद्रोही ’ मुस्लीमविरोधी असल्याचे व पक्षात सर्वजातीजमातींना स्थान असल्याचे जनसंघ सांगत असला तरी त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. कारण राजकारणात सोयीनुसार अशी वक्तव्ये करावी लागतात. प्रत्यक्षात हिंदुस्थान हिंदुओंका...याच घोषणेवर त्या पक्षाची मनोमन श्रद्धा आहे. तरीही सर्वसाकल्याने विचार करता जनसंघ हा हिंदूंचा हित-कर्ता पक्ष आहे असे मानता येणार नाही. कारण जनसंघाच्या धोरणात हिंदुप्रेमा-पेक्षा मुस्लीमद्वेषच जास्त दिसून येतो. वेगळ्या शब्दात सांगावयाचे तर जनसंघाचे राजकारण नकारात्मक आहे. त्याला हिंदूंच्या सुधारणेपेक्षा मुस्लिमांचा विरोधच

जास्त प्रिय आहे. जनसंघ वाढण्यासाठी कारण म्हणून, मुस्लिमांचा 'माजोरीपणा' अधिक वाढावा असे त्याला मनोमन वाटते. भारतातील जातीय दंगली पाकिस्तानातील राज्यकर्त्यांप्रमाणे जनसंघालाही संजीवनी किंवा टॉनिकप्रमाणे आवश्यक वाटतात. पाकिस्तानातील हिंदूंच्या हकालपट्टीने तेथील मुस्लीम जनतेच्या कोणत्याही समस्या सुटल्या नाहीत. तद्वतच भारतातील मुसलमानांच्या निर्दलनाने किंवा निर्गमनाने भारतीय हिंदूंच्या समस्या सुटणार नाहीत हे सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

आजही देशाची प्रगती म्हणजे ८० टक्के हिंदूंचीच प्रगती असा अर्थ आहे. या नंग्याभुक्या लोकांना काय हवे याचा जनसंघाने फारसा विचार केला नाही व जो काही केल्याचे सांगितले जाते त्याची अंमलबजावणी त्याच्याकडून होणे अशक्य दिसते. आजकाल जनसंघ म्हणजे जहागिरदार, माजी संस्थानिक यांचे आश्रयस्थान बनला आहे. हे लोक उद्या राज्यावर आले म्हणजे जनतेच्या आकांक्षा पूर्ण करतील असे मानणे शहामृगी मनोवृत्तीचे द्योतक ठरेल. भूमिमुक्ती आंदोलनाची जनसंघाने केलेली कुचेष्टा व केवळ सरकारी पडीक जमिनीच (जमीनदारांची जादा जमीन वगळून) भूमिहीनात वाटप करण्याची जनसंघाची मागणी त्याच्या कार्यक्रमांवर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे.

लोकांना आज समाजवाद हवा आहे व त्याचबरोबर राष्ट्रवाद व हिंदुत्ववादही हवा आहे. मागच्या पिढीपेक्षा आजची पिढी हिंदुत्ववादाकडे अधिक झुकलेली आहे असे मी बिनदिक्कतपणे म्हणतो. पण याचे कारण ती धार्मिक झाली आहे असे नव्हे तर मुस्लिमांनी अंगीकारलेल्या आंधळ्या परंतु आत्मघातकी धोरणाची व तथाकथित सेक्युलर पक्षांनी या धोरणाला नादानपणे घातलेल्या खतपाण्याची ती विरोधी पण स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. त्यांना जनसंघाचा धार्मिक व आर्थिक कार्यक्रम साफ नामंजूर आहे. कारण हीच तरुण पिढी आज जागोजागच्या आर्थिक प्रश्नावरील लढ्यात भाग घेत असून वैफल्याच्या पोटी नक्षलवादी होत आहे. नवी पिढी मनाने समतावादी आहे. तिला चातुर्वर्ण्याच्या किंवा सामंतवाद्यांच्या जाळ्यात पुन्हा ओढण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत

जनसंघ हा हिंदुत्वनिष्ठ नाही असे मी म्हणतो याला काही कारणे आहेत. खरा हिंदुत्वनिष्ठ हिंदुधर्मातील वैगुण्य सुधारण्याचा प्रयत्न करील. स्वा. सावरकर असे पहिले व शेवटचे हिंदुत्वनिष्ठ राजकारणी होते. जनसंघाजवळ अस्पृश्यता निवारणाचा कोणताही कार्यक्रम नाही. जो आहे तो देखावा मात्र व प्रामुख्याने राजकीय पातळीवरील आहे. हा प्रश्न देखाव्याचा नसून भावनेचा व वृत्तीचा आहे हे जनसंघ लोकांना पटवून देऊ शकला नाही. जनसंघाने गोहत्याबंदीचा प्रश्न हाती घेतला पण सावरकरांच्या वचनाप्रमाणे ही चळवळ हिंदूंना विज्ञानविन्मुख करणारी ठरेल. ही चळवळ हाती घेण्यात जनसंघाचे धोरण हिंदुरक्षणापेक्षा मुस्लीम विरोधाचे आहे.

२ डिसेंबर १९७०

मुस्लीमविरोधाचे कोलित म्हणून व त्यांना डिवचण्याचे साधन म्हणून त्याचा उपयोग होतो. अन्यथा गोरक्षण व गोसंवर्धनाच्या इतर कार्यक्रमांकडेही जनसघाचे लक्ष जाते. अस्पृश्यता निवारणाची चळवळ जनसंघ का हाती घेत नाही ? त्याचे एक कारण त्यात मुस्लिमविरोधाची धार नाही व दुसरे म्हणजे उच्चवर्णियांना दुख विण्याची त्याची इच्छा नाही. पंढरपूरचे मंदिर हरिजनांना उघडावे म्हणून साने गुरुजींनी प्राण पणाला लावले. आता बडवेगिरी बंद करण्यासाठी जनसंघ का सरसावत नाही ? त्याने बहुसंख्य हिंदूंना सुखसमाधान मिळणार असले तरी जनसंघ हा कार्यक्रम घेऊ शकणार नाही. कारण तेच ! उच्च वर्णियांना नाराज करावयाचे नाही. म्हणजेच गोहत्याबंदी वगैरे नकारात्मक प्रश्न घेऊन जनसंघ हिंदुत्वनिष्ठेपेक्षा मुस्लिमविरोधाची प्रतिमाच उभी करीत आहे असे म्हटले पाहिजे. काल परवा प. पू. गुरुजी बरे झाल्याबद्दल या मंडळींनी सत्यनारायण केला ! तरुणात विज्ञाननिष्ठा बिंबविण्याऐवजी त्यांना भाकडकथेपुढे मान तुकवावयास लावणारे नेतृत्व आपल्या समाजाचे कितपत भले करील हाही विचार केला पाहिजे. अशा प्रकारे हिंदूसमाजातील वैगुण्याकडे डोळेझाक करणारा किंवहुना त्याचाच गौरव मानणारा जनसंघ हाच हिंदूसमाजाचा खरा वैरी ठरतो. मुस्लिमांना कुराणकालाशी बद्ध करू पाहणाऱ्या मुल्लामौलवीत व यांच्यात फरक तो काय राहिला ?

वरीलप्रमाणे दोष असतानाही तरुण वर्ग आज जनसंघाकडे का आकर्षिला जात आहे ? याचे कारण वर सांगितल्याप्रमाणे इतरांच्या मुस्लिम अनुनयाच्या धोरणाच्या चिडीने ! या देशातील बहुसंख्य लोकांच्या भावनांना ठेच पोचविण्याचे कार्य नव्यापिढीला साफ नामंजूर आहे. पण म्हणून त्याला वर्णवाद, सामंतवाद मान्य आहे असा नव्हे. आजचा तरुण एका बाजूने हिंदुत्वनिष्ठ तर दुसऱ्या बाजूने समतानिष्ठ आहे. राष्ट्ररक्षणाच्या जनसंघाच्या हाकेला ओ द्यावी, एवढ्यात त्यानंतरच्या सामंतवादी, वर्णभेदी घोषणांनी तो गोंधळतो. समाजवादी, समतावादी घोषणांनी भुलुन साम्यवादाकडे धाव घ्यावी तर राष्ट्रद्रोहाची जाणीव होताच तो जागेवरच थबकतो. दोन्ही बाजूंकडील या प्रमादांमुळे तो गोंधळात पडलेला आहे.

जनसंघाच्या सामंतवादाच्या पुरस्कारामुळेच पुढे मागे नक्षलवाद जोरात फोफावण्याचा संभव आहे. आताच्या स्वरूपातील जनसंघ लोकांच्या राष्ट्रप्रेमाला आवाहन करून इटलीच्या मुसोलिनीप्रमाणे सत्तेवर आलाच तर अंतर्गतबाबतीत तो प्रस्थापितांचीच बाजू घेईल हे उघड आहे. ग्वाल्हेरच्या महाराणी उद्या मध्यप्रदेशाच्या मुख्यमंत्री झाल्या तर त्यांच्याकडून दुसरे काय अपेक्षित आहे ? अशा परिस्थितीत गोरगरीब जनतेला नक्षलवादाखेरीज दुसरा आधारच राहणार नाही. त्यातूनच चीन किंवा व्हिएटनामप्रमाणे भूमिहीनांचा तीव्र सशस्त्र लढा सुरू होईल. चँग-कै-शेकची राजवट तशी देशभक्ताचीच राजवट होती. द. व्हिएटनामचे आजचे राज्यकर्तेही

पृष्ठ ४७ वर



# कविवर्य बोरकर / एक धुंद व्यक्तिमत्त्व

रवींद्र पिंगे

आजचं शहर मुंबई म्हणजे गर्दी, गोंधळ, गडबड आणि गजबजाट. गिरगाव म्हणजे ह्या सर्वांच्या अर्काचं आगर. पंचवीस वर्षांपूर्वीच्या याच चित्रातले रंग मात्र आजच्या मानाने खूपच नितळ आणि शांत होते. गिरगावात गदारोळ नव्हता. शांत वस्त्या होत्या. निवांत रस्ते होते. गिरगावाच्या वेशीवरला गावदेवीचा लत्ता आपलं जुनं कोकणीरूपसंपदेचं खानदान जपून होता. तिथल्या डांबर गल्लीचं नाव नि रूप, दोन्हीही बेळगावात शोभून दिसतील अशी होती. झाडांची सावली होती. माडांची सळसळ होती. हाकेवर दर्याची गाज होती. रस्ते गावठी वळणाचे होते. घरं बैठी होती. कोकणातल्या देवळांसमोर असतात तशा दिपमाळा असलेलं औटकं बाळबोध देऊळ होतं. उंचावरून पाहिलं की टिपूरं चांदण्याचे लोट कौलारू घरांच्या छपरांवरून ओघळ-

ताना रात्रीच्या प्रहरी दिसत असत. पहाटेस कोंबड्यांची साद कानी पडे. घरांना अंगणं होती. अंगणात शुभ्र फुलोऱ्यांचे गुच्छ ल्यालेले शेवगे होते. रात्री तर तिथं सामसूम असायचीच. पण दुपारीही तिथे संथपणा असायचा. संध्याकाळी रातराण्या खुलायच्या. अशा त्या गावदेवीत चक्कर टाकली की कोकणाच्या शहरी आवृत्तीतच डोकावल्यासारखं वाटायचं. आम्ही दुपारच्या वेळी तिथे घिरट्या घालायचे. अशाच एका निरुद्देश भ्रमंतीत त्या कोकणी वस्तीत, कोकणी काळीजाशी इमान राखून बहारदार कविता करणारे बोरकरकवी प्रथम मला दिसले. साधा खादीचा पोषाख होता. अंगलट किरकोळ होती. नाचकाम शिकवणाऱ्या मास्तरांचे असतात, तसे केस वाढवलेले होते. त्यांच्याबरोबर पाडगावकर, मंत्री, प्रभु वगैरे उमेदवार कवींचं टोळकं होतं. आपल्याच नादात ते पायीपायी भटकत होते. नंतर कळलं, बोरकर गोव्याची माती आणि मासळी सोडून मुंबईला पोटापाण्यासाठी आणि प्रचारकार्यासाठी आले आहेत. जे. के. चाळीत ते नातलगांकडे मुक्काम करून होते. एकटेच होते. बायकामुलं मागे बोरीला होती. तिथं घरदार असल्यामुळे त्यांचं बरं होतं. बोरकर मात्र आर्थिक ओढगस्तीत होते. पुढे एकदा पाडगावकर म्हणाले, 'बोरकर फार कळ सोशीत होते. त्यांच्या खिशात ट्रॅमसाठी आणेलीही नसायची. कुठे किरिस्तावांना हिंदी शिकव, कुठे कवितावाचन कर, कुठे लेख लिही, असं करून पोट जेमतेम भरीत होते. पण त्या तशा अडचणींच्या दिवसातही ह्या कैफी कवीची ताठ मान कधी वाकली नाही. त्यांनी कुठेही हातउसनवारी केली नाही.' खुद्द बोरकरांची मुलगीही माझ्या दुसऱ्या एका कवी मित्राला म्हणाली होती 'आम्ही फार कठीण दिवस पाहिले आहेत, काही काही वेळा डोक्याला तेल लावायला आमच्याकडे पैसे नसायचे. पण आबांची मान मात्र ताठ असे. ते कुणापुढंही नमत नसत.'

त्या काळखंडाबद्दल मी बोरकरांना विचारलं. ते म्हणाले, 'माझं गोव्यातलं शिक्षकाचं आयुष्य फार सुखात चाललं होतं. केप्याच्या सरकारी शाळेत जवळपास नव्वद रुपये पगार मिळायचा. त्या दिवसात तो फारच मोठा वाटे. कवी म्हणून चौफेर कौतुक होत होते. कशाला काही तोटा नव्हता. भारतीय स्वातंत्र्याचा जो प्रखर लढा गोव्याच्या बाहेर चालू होता, तिकडे मन आकर्षित झालं होतं. गोव्याच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आणि भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न हे दोन वेगवेगळे प्रश्न नसून, एकच आहेत, अशी माझी भावना होती. पण पं. नेहरूंनी जाहीर करून टाकलं की गोव्याचा स्वातंत्र्यलढा ही केवळ स्थानिक बाब (local affair) आहे आणि भारतीय काँग्रेसला त्याच्याशी सुतराम कर्तव्य नाही! पं. नेहरूंचं हे अजब मत म्हणजे गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यावर वज्राघातच होता. गोवेकरांच्या लढ्याचं नैतिक अवसानच त्यामुळे गळून पडलं. कुणीतरी नेहरूंना गाठून त्यांना वस्तुस्थिती सांगणं आवश्यक होतं. ते काम मी अंतरीच्या उमाळ्याने स्वीकारलं. तसाच गोव्याबाहेर पडलो. पंडीतजींची गाठ घेतली. वर्ध्याला गेलो. त्यांना पटवून दिलं की गोवेकर

जनता स्वातंत्र्यासाठी आसुसलेली आहे आणि भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नातच गोव्याच्या स्वातंत्र्याचाही प्रश्न गोवलेला आहे आणि भारतीय काँग्रेसने आपला नैतिक पाठिंबा गोवा स्वातंत्र्य लढ्याला दिला पाहिजे. माझं म्हणणं पंडितजींना पटलं. त्यांनी आपलं पूर्वीचं मत बदललं आणि गोव्याच्या स्वातंत्र्यसंग्रामला निःसंदिग्ध शब्दात आपला पाठिंबा जाहीर केला. ह्याच फळ म्हणजे गोव्याच्या पोर्तुगीज सत्तेची माझ्यावर वक्रदृष्टी झाली. माझी नाकेबंदी झाली. बरं, सगळा संसार तिकडे टाकलेला. गोव्यात गेलो तर पकडला जाणार. न गेलो तर कुटुंबाचे हाल. असा बेचकीत अडकलो. गोव्यात परत या असा सरकारी निरोप आला. माझ्या म्हाताऱ्या वडीलांनाही सरकारने बोलावून घेतलं. मला चांगल्या पगाराच्या नोकरीचं आमिष दाखवलं. असाही युक्तिवाद केला की गोव्याचं सरकार जर जुलमी आणि वाईट म्हणता, तर आपल्या बायकामुलांना इथे कसं ठेवलंत ? तेव्हा एक तर गोव्याचं पोर्तुगीज सरकार चांगलं आहे असं कबूल करा. न पक्षी, तुमची बायका-मुलं इथून घेऊन चला ! प्रश्न पडला ह्या मंडळींना आणायचं कसं ? पकडणार तर नाहीत ? शेवटी माझ्या नातेवाईकांनी माझ्या कुटुंबियांना गोव्याबाहेर सुखरूप आणलं. त्यांना पोर्तुगीजांनी तकलीफ दिली नाही. तेव्हापासून मी गोव्याच्या स्वातंत्र्य-संग्रामाशी एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून तद्रूप झालो. काव्यलेखनाच्या निमित्ताने काकासाहेब कालेलकरांशी परिचय होताच. ह्या नव्या पर्वामुळे नातं अधिक स्निग्ध झालं. त्यांच्यामुळे पंडीतजी, गांधीजी, विनोबाजी, बजाज, वगैरे थोर मंडळींच्या मी निकट सान्निध्यात आलो. आजही काकासाहेबांचं माझ्यावर पुत्रवत प्रेम आहे.'

हाच धागा धरून मी विचारलं, 'तुम्ही 'महात्मायना'चा संकल्प केव्हा सोडलात ? आणि त्यासाठी गांधीनिधीतून तुम्हाला द्रव्यसहाय्य झालं हे खरं आहे ?' त्यावर बोरकर म्हणाले, 'सांगतो. महात्माजींच्या तपःतेजाने मी भारावून गेलोच होतो. गोवेकरांचं शिष्टमंडळ वर्ध्याला नेण्याच्या निमित्ताने काकासाहेबांच्या मार्फत मी त्यांच्या निकटवर्तीयांच्या गोटात प्रवेश मिळवला होता. त्यांच्या हत्येच्या अगोदर वीस-बावीस दिवस त्यांना मी भेटलो होतो. खूनाची बातमी आली तेव्हा तर मी दिङ्मूढ होऊन गेलो. नंतर रात्री मला एक स्वप्न पडलं. त्या स्वप्नात महात्माजी एका पिंपळाच्या पारावर जरा आडवे होऊन झोपी गेलेले दिसले. त्यांची सेवा करावी म्हणून मी पाय चेपायला गेलो. महात्माजींच्या पायांना स्पर्श केल्याबरोबर मला विजेचा धक्का बसावा तसं झालं. स्वप्नात माझं सगळं अंग शहारलं. रात्रीची वेळ होती. मी जागा झालो तो ह्याच विचाराच्या कल्लोळात की महात्माजी मेले नाहीत; महात्मा अमर आहे – अमर आहे ! तसाच उठलो. टेबलापाशी गेलो. दिवा लावला. आणि कागदावर सुचत गेलेल्या ओव्या आपोआप लिहू लागलो. जणू, माझा कबजा कुणी अतिंद्रिय शक्तींनी घेऊन माझ्या हस्ते आपले मनोगत कागदावर टिपून काढले ! त्या झपाटल्यासारख्या लिहिलेल्या

ओव्या 'युगात्मा' ग्रंथात समाविष्ट झाल्या आहेत. त्या ओव्यांच्या लेखनाने 'महात्मायना'चा शुभारंभ झाला. पुढचा आराखडा वगैरे नंतरच्या गोष्टी. आता द्रव्यसहाय्याबद्दल सांगतो. माझे काव्यलेखन चालूच होते. गोव्याच्या मुक्ती-लढयातही माझी शक्तियुक्ती कारणी लागत होती. काकासाहेबांमुळे बजाज कुटुंबियांशी माझा स्नेह जडला होता. माझ्या कवितेचे ते चहाते होते. एकदा कमलनयन बजाज म्हणाले, की तुम्ही जे कार्य करता, कविता लिहीता, ते सर्व अखेर देशासाठीच आहे. तेव्हा, पोटापाण्याची विवंचना थोडीशी दूर व्हावी आणि तुमच्या सगळ्या शक्ती तुमच्या अंगीकृत कार्यावर केंद्रित व्हाव्यात, 'महात्मयना'चं लेखन निर्वेधपणे व्हावे, ह्या एकाच हेतूने आणि तुमच्याबद्दलच्या प्रेमादरामुळे मी तुम्हाला आमच्या बजाज कुटुंबाच्या खाजगी निधीतून दरमहा काही रक्कम देत जाईन. तुम्ही ती स्वीकारावी. कुठल्याही अटी नसलेली ही केवळ मित्राची भेट आहे. ह्या भेटीचा मी स्वीकार केला. 'महात्मायन' निर्वेधपणे लिहू लागलो. ह्यात बांधीनिधीचा काहीही संबंध नाही.'

'मग हे काम इतकं रेंगाळलं कशाने?'

'गोव्याच्या मुक्तीचे तेजस्वी पर्व सुरू होते, तोपर्यंत माझ्या मनाची उभारी होती. मन एकतान झालं होतं. पण पुढे उदात्त स्वातंत्र्यकारणाची जागा क्षुद्र राजकारणाने घेतली. माझे-तुझे सुरू झाले. माझी समाधी भंग पावली. लावू म्हटल्याने मनाची लय लागेना. 'महात्मायना'चं लेखन ज्या उदात्त पातळीवरून व्हायला हवं, ती गाठणं सभोवतीच्या परिस्थितीमुळे साधेना. कोकणी भाषेच्या उन्नतीचंही काम होतंच. दिवस सरत होते. उरी खिन्न होतो. इतक्यात डॉ. केसकरांकडे आकाशवाणीचं खातं आलं. पुं. म. लाड सचिव झाले. त्या दोघांनी आकाशवाणीच्या कार्यक्रमांचा कायापालट करण्याचा मांड घातला. हे उद्‌बोधनाचं कार्य त्यांना सृजनशील लेखक-कलावंतांकडून करवून घ्यायचं होतं. बडे बडे लेखक, कलावंत त्यांनी आकाशवाणीत नोकरीला आणायचं ठरविलं. लाड माझे खास स्नेही. त्यांनी विचारलं, 'आकाशवाणीवर येता काय? आम्हाला कृतज्ञता वाटेल.' मी म्हटलं, ते 'आपणा दोघांनाही अडचणीचं होईल. तुम्ही माझे मित्र. मी नोकरीत आल्यावर तुम्ही साहेब होणार. मला तुम्हाला पदोपदी 'यस् सर' करावं लागणार. मित्राला 'सर' कसं म्हणायचं? म्हणजे मला अडचण. मित्राकडून 'सर' कसं म्हणवून घ्यायचं? म्हणजे तुम्हालाही अडचणच. तेव्हा हे प्रकरण बंदच करूया. पण लाड ऐकेनात. म्हणाले, मी तुमचा मित्र. उद्या तुमच्याकडे जेवायला येतो. म्हटलं, या; घर तुमचंच आहे. लाड आले. आम्ही मासळीभात खाल्ला. मग लाड म्हणाले, तुम्ही आमच्या नोकरीत या. आपली मैत्री अलांच्छनच राहील. तुम्ही 'सर' म्हणायची आवश्यकता नाही. आता प्रश्न उरला सरकारी नोकरीतल्या कटोर नियमांचा. अमुक लिहायचं नाही, तमुक बोलायचं नाही, ह्याची परवानगी

ध्यायची वगैरे. लाडांना मी स्पष्ट सांगितलं, मी ही बंधनं जुमानणार नाही. अर्थात, अराष्ट्रीय किंवा सरकारी न्याय्य धोरणाविरुद्ध असं काही माझ्या हातून घडणार नाही. पण नसती बंधनंही मानणार नाही. लाडांनी त्यालाही मान्यता दिली. मग कुटुंबाचा विचार केला. रुक्मिणीही म्हणाली, स्वीकारा नोकरी, पोराबाळांना चार दिवस बरे येतील. शिवाय जाच वाटला तर नोकरी सोडायला तुम्ही मोकळेच आहात. मीही विचार केला की हिने माझ्या संसारात खूप तापत्रय काढला आहे. आता दारात गंगा आली आहे, तर नाही म्हणू नये. मी होकार भरला. छपन्न साली पुणे केंद्रावर मी प्रोड्यूसर म्हणून काम सुरू केलं. गेल्या वर्षी, म्हणजे एकूणसत्तर साली पणजी केंद्रावरून मी वयोमानपरत्वे प्रोड्यूसर म्हणून सेवानिवृत्त झालो. ह्या एका तपाचा कालखंडात मी कुणालाही सर म्हटलं नाही, कुणाची कधी परवानगी काढली नाही. कुणाकडून फट् म्हणवून घेणं तर माझ्या कुंडलीतच नाही. मी वत्स गोत्री आहे. वत्स गोत्राचं वैशिष्टय म्हणजे त्याला अन्याय सहन होत नाही. तो अरेला कारे करतो. संतकवी सोहिरोबा अंबिये वत्सगोत्रीच होते! त्यांनी कुणाचीही पर्वा केली नाही, की कधी अन्याय सहन केला नाही.'

'आकाशवाणीवर आलात तरी बजाजांचा प्रेमोपहार चालूच राहीला?'

'तो चालूच रहावा अशी बजाजांची इच्छा होती. पण मीच नकार दिला. म्हटलं हेच पैसे दुसऱ्या एखाद्या गरजू कलावंताला द्या. मला आकाशवाणी पगार देईल. बजाजांचे पैसे मी पुढे बंद केले.'

आता सेवानिवृत्तीनंतर काय करणार?

'गोव्यात बोरीला माझं घरदार आहे. तिथे शांतपणें रहाणार. 'महात्मायना' चे अपूर्ण लेखन पूर्ण करण्याचा मनोदय आहे. येत्या पांच वर्षांतच नेट लावला पाहिजे. तरच ते काम पूर्ण होईल. एरव्ही ते माझ्या बापाच्याने सुद्धा होणार नाही. मी लिहितो आहे. विनोबाजी म्हणाले, आपण ओंजळ पसरून कृपाप्रसादाची वाट पहावी. वरून केव्हा वृष्टी होईल सांगता येत नाही. तेव्हा मी ओंजळ पसरून कृपा-वृष्टीची वाट पहात आहे. दुसरंही एक काम हाती घेतलं आहे. ते म्हणजे संतकवी सोहिरोबा अंबिये ह्याच्या समग्र कवितेचं संपादन. ह्यातलं अधिकाधिक काम तयारही झालं. सोहिरोबा हे गोव्याच्या सरहद्दीवरल्या बांदे गावचे मठस्थ साधुपुरुष. ते सारस्वत. वत्स गोत्री. अतिशय तेजस्वी माणूस. काव्यापेक्षा माणूस मोठा असतो ह्याचं सोहिरोबा हे उत्तम उदाहरण. हा कोंकणात जन्मला नि जगला म्हणून त्याच्या कवितेची उपेक्षा झाली. तो प्रकाशात आला पाहिजे, आणला पाहिजे. पूर्वी त्याची कविता प्रसिद्ध झाली होती. पण ते सगळं विस्कळीत कार्य, आता एकसूत्रीपद्धतीनं झालं पाहिजे. मी त्यातही गुंतलो आहे. माझा हा स्वभावच आहे की प्रत्येक गोष्टीत मला रस वाटतो नि नेट लावून लक्ष घातलं तर मी फार वरच्या श्रेणीचं यश मिळवितो. मी गाण्यात लक्ष घातलं असतं तर उत्तम गवैया झालो असतो. आता

चित्रकलेत लक्ष घातलं आहे. घरी चित्रं काढली आहेत. बायकोचं एक पोर्ट्रेट केलं आहे. ते पाहून दीनानाथ दलालांसारख्या मुरब्बी कलावंतानेही दाद देत सांगितले की बोरकर, तुम्ही पांच वर्ष जर हातात कुंचला ठेवलात, तर रंग कामात फार वरची पातळी गाठाल ! माझा हा स्वभावधर्मच आहे. जे हाती घेईन त्यात रंगून जाईन; काही एक पातळी गाठीन. तुम्हाला कल्पना आहे, सध्या मी हिंदीत रचना करू लागलो आहे ? पंधरावीस हिंदी कविता तयारही झाल्या. असाच रमलो तर दोन चार वर्षांत माझा हिंदी संग्रहही निघेल नि हिंदी साहित्यसेवकांतसुद्धा मला मानाचं आसन मिळेल ! हा साधनेचा नि कृपाप्रसादाचा प्रश्न आहे.'

'आनंद आहे. पण इथवर आपलं बोलणं झालं तुमच्या जीवितकार्याविषयी किंवा उपरोधिक शब्दात सांगायचं तर तुमच्या अवतारकार्याविषयी! त्या उच्च पातळीवरून आपण पाच मिनीटं खालच्या म्हणजे दैनंदीन आयुष्याच्या पातळीवरून बोलूया. काय ? मला काही खाजगी माहिती हवी आहे.'

'विचारा की.'

'तुम्ही केव्हा नि कुठे जन्मलात ?'

'गोव्यात कुडचडे ह्या गावी माझं आजोळ होतं. तिथे मी ३० नोव्हेंबर १९१० रोजी जन्मलो. मी माझ्या आईबापांचा सर्वांत थोरला मुलगा. माझं नांव बाळकृष्ण ठेवलं. मला बाकीबाब म्हणतात.'

'बाळकृष्णाचं बाकीबाब कसं झालं ?'

'माझी आत्या मला कौतुकाने बाकीट म्हणायची. त्यातला 'ट' गळला, 'बाकी' उरला. लोक आदराने बाब लावू लागले. तेव्हा बाकीबाब झालो. पण पुढे जसा मी कीर्तीमंत होऊ लागलो तसं मला बाकीबाब असं लाडात म्हणायचं माझ्या आई-वडिलांच्या जीवावर येऊ लागलं. ते मला आदराने आबा म्हणू लागले. मला मात्र त्याची खंत वाटू लागली. कारण आपण इतके मोठं होऊ नये की ज्यामुळे खुद्द जन्मदात्या मातापित्यांनाच त्यामुळे अवघडल्यासारखं होईल !'

'तुमचे वडील काय करायचे ?'

'वडीलांचं नाव भगवंत. ते गावचे पाटील होते. वृत्तीने ते धुंद, ड्रिमर होते. एक खानावळीचा धंदा सोडल्यास त्यांनी बहुतेक सगळे धंदे केले. सराफी केली, ऊसाची लागवड केली, सिद्धनाथ डोंगरावरले दगड आणून त्यांच्या लाद्या केल्या, मद्यार्काची निर्मिती केली. ते रेव्हरंड टिळकांसारखे स्वतःच्याच मस्तीत असत.'

'तुमचं शिक्षण कुठे झालं ?'

'गोव्यात प्राथमिक शाळा अशी नव्हतीच. मास्तर तात्पुरते येत. चार अक्षरं शिकवीत. पणजी आणि बोरी ह्या दोन्ही गावात माध्यमिक शिक्षण झालं. १९२८ मध्ये

पृष्ठ ५४ वर

सौ. तारा पंडित

# सतावणारे सुंदर स्वप्न

ऑफिसमधून घरी जाता जाता एक कप चहा घ्यावा म्हणून तो एका हॉटेलात घुसला. एका टेबलाशी मित्र चहा पीत बसलेला दिसला. दोघांची दृष्टादृष्ट झाली. त्याने खूण केली नि हा त्याचेजवळ जाऊन बसला. खूप दिवसांनी मित्र – देवप्रसाद त्याचं नाव – भेटला खरा पण त्याच्या चेहऱ्यावर चिंतेचं जाळं पसरलेलं दिसलं.

'तू चिंतामग्न का दिसतोस ? काही विशेष ?'

– संभाषणाला सुरुवात झाली.

देवप्रसाद म्हणाला, 'चिंतामग्न आहे खरा. एक विचार मला सारखा सतावतो आहे रे. काय करू ?'

'कसला विचार ? काही पर्सनल...?'

'छे, छे !'

'मला सांगण्यासारखं असेल तर...'

'अवश्य ! तुलाच काय, कोणालाही सांगण्यासारखा विचार आहे तो. खरं सांगू ?...कलकत्त्याची मला काळजी वाटते रे !' – देवप्रसाद काळजीच्या सुरात बोलला.

त्याच्या मित्राला हसू आलं. तो म्हणाला–

'हात्तिच्या ! एवढंच ना ? मग तू काळजी करणं एकदम सोडून दे. अरे, कलकत्त्याची काळजी वाहण्याची तुला काय गरज ? ती काळजी करायला पुष्कळ लोक आहेत की. कलकत्ता कार्पोरेशन आहे, पश्चिम बंग सरकार आहे, मध्यवर्ती सरकार आहे, CMPO (कलकत्ता मेट्रोपोलिटन प्लॅनिंग ऑर्गनायझेशन) सुद्धा आहे. तू जास्त विचार करू नकोस.'

यावर देबू म्हणाला, 'हेच तर आहे ! अरे, ते सगळे काळजी करतात म्हणून तर मी काळजीत पडलोय. अलीकडेच वर्तमानपत्रात मी वाचलं की सर्वांचच लक्ष आता कलकत्त्यावर केंद्रित झालं आहे. झोपडपट्टी यापुढे दिसणार नाही म्हणतात. सर्क्युलर रेल्वे अस्तित्वात येणार, ओव्हरहेड रेल्वे होणार नि अंडरग्राऊंड रेल्वे-

देखील तयार होणार असंही म्हटलं जात आहे. वगैरे वगैरे.'

'ओऽऽ! तू वाचलंस म्हणायचं हे सगळं!' आता देबूला आवेश चढला. म्हणाला, 'एवढंच नाही, मी आणखीसुद्धा वाचलं आहे. आता कलकत्त्यात पावसाचं पाणी जमणार नाही. जमलंच तर काही तासातच — नव्हे काही मिनिटातच पंपाच्या साहाय्याने ते काढून टाकण्यात येईल. म्हणजे उगाच रस्त्यातून होड्या चालवण्याचा प्रसंग यायला नको. शिवाय पाण्याखाली सापडलेल्या घरातून असहाय लोकांना वाचवण्यासाठी मिलिटरी बोलावण्याचीही गरज उरणार नाही. कलकत्त्याची स्थिती सुधारण्यासाठी अमाप पैसा खर्च करण्यात येणार आहे. बरं. आणि काय सांगू, सारं कलकत्ता शहरच एक दिवस बदललेलं दिसेल. सुंदर घरं, छानछान पार्क, लोकांसाठी कितीतरी सोयी, हुगळीवर अनेक पूल, विपुल प्रमाणात मासे, नवीन नवीन शाळा कॉलेजं...आणि काय आहे, समस्या अशा उरणारच नाहीत त्यामुळे शैक्षणिक संस्थांना राजकारणाची आसही लागणार नाही, सारं कसं शांततेत चालू राहील. थोडक्यात म्हणजे येत्या दहा वर्षात कलकत्ता हे पाश्चिमात्य शहरांच्या तोडीचं शहर दिसू लागेल; ज्याचा अभिमान वाटावा असं आदर्श शहर बनेल...'

'तुला असं वाटतं का हे सगळं नुसतं कागदावरच राहील म्हणून?' मित्राने देबूला स्वप्नातून जागं केलं.

'छे! छे!! हे सगळं प्रत्यक्षात घडून येईल आणि आपण जिवंत आहोत तोवरच होईल...पण...काय सांगू?...माझ्या अंगावर शहारे येतात रे!'

आता मित्र बुचकळ्यात पडला. देबूला म्हणाला, 'मग तर तुला आनंदच व्हायला पाहिजे. यात शहारे येण्यासारखं आहे तरी काय?'

देबू चटकन् विचारता झाला, 'या चित्राची दुसरी बाजू तू पाहिली आहेस काय?'

'दुसरी बाजू? ती कोणती?'

'ऐक सांगतो.' असं म्हणून देबू सांगू लागला—

'कलकत्ता शहर चांगलं होईल, तेथे सगळ्या सुखसोयी निर्माण होतील हे खरं असलं तरी आज हे शहर अजिबात राहण्यायोग्य नाही आणि दिवसेंदिवस त्याची स्थिती अधिकच खराब होत चालली आहे. अशा ह्या शहरात राहणारे कित्येक लाख लोक असे आहेत की ते कलकत्ता सोडून जाण्याचा विचार देखील मनात आणीत नाहीत. उलट, आणखी आणखी लोक ह्या भयंकर शहरात येऊन राहात आहेत...आता तूच सांग, ह्यातून माणसाने काय निष्कर्ष काढावा बरं?'

मित्र विचारात पडला. पण देबूने त्याला फार वेळ विचारात ठेवले नाही. तो म्हणाला—

'एकच निष्कर्ष निघू शकतो. जो जो हे शहर राहण्यास अयोग्य होत आहे तो

तो अधिकाधिक लोक इथे येऊ लागले आहेत. आता ज्या अर्थी जास्त वाईट स्थिती असेल तर जास्त लोक राहायला येतात त्या अर्थी स्थिती सुधारू लागली की लोक कमी कमी होणार (म्हणजेच कलकत्ता सोडून जाणार) आणि ९५ टक्के सुधारणा झाली की जवळजवळ सर्व कलकत्ता रिकामं होईल, हे सरळ लॉजिक आहे. अन् मग काय होईल ?...कलकत्ता अगदी ओस पडेल...अन् कलकत्ता ओस पडलं की इथली सारी संस्कृती नष्ट होईल...त्या महेंजोदारो सारखी, हरप्पा सारखी, फतेपूर सिक्री सारखी...'

'वा, वा ! फारच मजेदार विधान आहे हे ! पण काय रे; यावर उपाय सुचतो का तुला ?...तू काय कारायचं ठरवतोस ?' मित्राने विचारलं.

देवू चटकन म्हणाला, 'मी उपाय योजला आहे. आता मी एक नवी चळवळ सुरू करणार. ह्या चळवळीचं घोषवाक्य असं राहील–

'आमचं कलकत्ता असंच राहू द्या...
त्यात सुधारणा करू नका...
लीव्ह कलकत्ता अलोन...'

¤

# इंटरव्ह्यू

खोलीत मुलांची गर्दी झालेली होती. ही सगळी मुलं हायर सेकंडरीची परीक्षा पास झालेली, कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या इंटरव्ह्यूसाठी आलेली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्सुकता, नजरेत अजाण बालीश भाव. प्रत्येक मुलगा आपली पाळी केव्हा येते याची वाट बघत बसलेला. पलीकडे अर्ध्या दरवाजाआड मोठ्या टेबलासमोर प्रिन्सिपल बसलेले. एकेका मुलाला चपरासी आत पाठवित होता. काही मिनिटे झाली की तो मुलगा बाहेर यायचा नि तडक निघून जायचा. त्याचा चेहरा पाहून अंदाज बांधण्याची संधी इतरांना मिळू शकत नव्हती. इंटरव्ह्यू कसा होणार याची कल्पनाचित्रे रंगवीत रांगेने बसलेल्या मुलांमध्ये तो पण होता...

अन् मग त्याची पाळी आली. तो आत गेला. प्रिन्सिपलसमोर तो बसला. तसा तो निर्भीड होता. त्यामुळे इतर मुलांप्रमाणे त्याला घाम फुटला नाही इंटरव्ह्यू सुरू झाला.

'किती वाजता उठतोस ?'

'सहा वाजता'–विद्यार्थ्याचे उत्तर.

'नो.. नो...हे चालणार नाही. सहा वाजता कॉलेज सुरू होतं...तुला लवकर उठावं लागेल.'

'उठेन मी.'

'एकदम जमणार नाही. रोज आदल्या दिवसापेक्षा पंधरा मिनिटे अगोदर अलार्म लावीत जा. हळूहळू तुला साडेचारला उठायची संवय लागेल...समजलं.'

'सर, मी उद्यापासूनच साडेचारला उठायची संवय करीन.'

'अहं. एकदम जमणार नाही.' प्रिन्सिपल म्हणाले.

'सर, मला एकदमच जमेल.'

ह्या उत्तराने सर जरा चपापले. लगेच त्यांनी स्वतःला सावरलं.

'बरं, तू कॉलेजात येणार कसा ?...घरी गाडी आहे ?'

'माझ्या बापाजवळ गाडी नाही. मी ट्रामने येणार...अन् पुढचा रस्ता चालत.'

'रोज काहीतरी खाऊन यावं लागेल. उपाशी पोटी कॉलेजात यायचं नाही.'

'ठीक आहे, सर !'

'Allright ! you seem to be a very smart boy !'..मग त्यांनी हळूच विचारलं,

'काय रे, तुला पॉलिटिक्समध्ये इंटरेस्ट आहे ?'

'तसा विशेष नाही.'

'बघ हं. तू जर नक्सलाईट झालास तर मी तुला उचलून खिडकीबाहेर फेकून देईन.'—एक डोळा मिचकावीत प्रिन्सिपल म्हणाले. त्या मुलाने चटकन उत्तर दिलं—

'सर, तुम्ही मला फेकायचं की मी तुम्हाला फेकायचं हे काळच ठरवील.'

'काय ?' सर ओरडले. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव अकस्मात बदलले. त्या मुलानें पुन्हा तोंड उघडलं नाही. फक्त तो गालात हसला.

प्रिन्सिपल आणखीच थक्क झाले. पण चेहऱ्यावरचे भाव अधिक कठोर करीत व कपाळावर आठ्या घालीत त्यांनी विद्यार्थ्याकडे पाहिलं अन् लगेच चपराशाकडे नजर वळवीत ओरडले,

'Next !'

इंटरव्ह्यू संपला म्हणून हा मुलगा उठून गेला. चारपाच दिवसांनी त्याला कॉलेजचं कार्ड आलं—

'....admission not granted..'

—स्पष्टवक्तेपणा कधीकधी असाच भोवतो !

□ □ □

# योजना चांगली राबवणारे चांगले हवेत !

सुभाष देशपांडे

नगरच्या कॉलिजमधील प्रा. हळबे हे ह्या योजनेचे संस्थापक. नगरच्या आसपासच्या २० खेड्यांचा विकास, नगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहाय्याने करण्याचे त्यांचे स्वप्न ते प्रत्यक्षात उतरवत आहेत. गेल्या वर्षी केंद्रीय शासनाने ही योजना स्वीकारली. आज्ञा गेल्या. ३८ विद्यापीठातील ४०,००० विद्यार्थ्यांना बळेच या योजनेत ओढण्यात आले. योजनेमार्फत श्रमदान कार्यक्रम, शिबीरे देशभर आयोजित करण्यात आली. यंदाच्या वर्षी ९८,००० विद्यार्थी योजनेत आले. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी २ लाख विद्यार्थी म्हणजे एकूण विद्यार्थ्यांच्या १० टक्के (महाविद्यालयीन) विद्यार्थी या योजनेत असतील.

खरे म्हणजे एन. सी. सी., पी. टी. ह्या योजना विद्यार्थ्यांच्या डोकेदुखी होऊन बसल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ह्या एन्. एस्. एस्. (नॅशनल सर्व्हिस स्कीम – राष्ट्रीय सेवा योजना)चा जन्म झाला. महाविद्यालयीन जीवनात ज्यांना पुढं पुढं करण्याची, प्रसिद्धीची, आपण स्वतः थोडंफार करावं अशी इच्छा असते असे विद्यार्थी या योजनेत एकत्र आले. मग हौशे–नौशे–गौशे एकत्र आल्यानंतर जसा कारभार असेल, तसाच थोडा ढिलेपणाही ह्या योजनेत पाहावयास मिळाला तर त्यात नवल नाही.

विद्यार्थी महाविद्यालयीन जीवनात केवळ पुस्तकी ज्ञान मिळवितो. त्याला आपल्या आसपास काय चालले आहे, याची जाणीव नसते, म्हणन आसपासच्या समाजाविषयीचे निरीक्षण करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण करणारा जबाबदार

विद्यार्थी या राष्ट्रीय सेवा योजनेतून बाहेर पडावा ही मूळ कल्पना. मी ज्या समाजात राहतो, त्या समाजाचे ऋण मी फेडले पाहिजे ही अपेक्षा. आता हे कितपत साध्य होते ते पाहू.

कुठलीही संघटना म्हटली की कार्यक्रम आलेच. त्यातून या योजनेला तर महाविद्यालयीन स्तरावर संपूर्ण स्वातंत्र्य आहे. झाले, मग काय उत्साहाला तोटा !

सुरुवात झाली उद्घाटन समारंभाने – त्यासाठी कसेबसे ५०–६० विद्यार्थीगण आले. –खा. अनंतराव पाटील बोलले – देशाचे चित्र इतिहास, भूगोल, राज्यकर्ते, समाजकार्यकर्ते कोणी बदलवू शकत नाहीत. फक्त विद्यार्थीच राष्ट्राला उच्च पदी नेऊ शकतात, इत्यादी.

कार्यक्रमालाही सुरुवात झाली. पहिल्यांदा घर साफ करायचे ठरले. महाविद्यालयीन आवार, बाग, मैदान गवत वगैरे उपटून साफ झाले. नवीन वृक्षासाठी खड्डे खणून पूर्ण तयारी केली गेली. नंतर वृक्षारोपण झालेच नाही. ४।८ दिवसांत वृत्तपत्रातून लेख वगैरे आले. विद्यार्थ्यांनी विधायक काम करावे, स. प. महाविद्यालयाचा स्तुत्य कार्यक्रम वगैरे वगैरे.

हो, एवढे खरे की जेवढे विद्यार्थी, म्हणजे समजा ३०, ४०, ६० एकत्र आले, त्याच्या दुप्पट हातांनी म्हणजे ६०, ८०, १२० हातांनी काम केले. कधी मजुरापेक्षा कमी, कधी मजुरापेक्षा जास्त. शेवटच्या थोडया ब्रेकफास्टवर मंडळी खूष.

ब्रेकफास्टच्या वेळी कोणी एखादे गाणे म्हणेल, विनोद करेल इतकेच. पण एवढे होऊन ही योजना इतक्या द्रुतगतीने वाढली कशी ? याचा थोडा उलगडा असा झाला की केंद्रीय शासनाने या योजनेसाठी ४ कोटी रु. मंजूर केलेत. हे एक झाले, पण केवळ पैशाने योजना यशस्वी होत नाहीत, याचे उत्तर सापडले.

नगरला एन्. एस्. एस्. चे नेतृत्व शिबीर झाले. ३८ महाविद्यालयातील १३८ विद्यार्थी आले. त्यापैकी बरेचसे कार्यकर्ते त्यांच्या त्यांच्या कॉलेजमध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य करतात असे समजले. आम्ही त्या शिबीरातले पण परिषदेचे कार्यकर्ते एकमेकांना भेटलो–बोललो–चर्चा केली आणि ठरविले, की केवळ ABVP–ABVP करीत बसायचं नाही. तर या शासनाच्या योजनेतही घुसले पाहिजे. या योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी आपले सर्व कौशल्य परिषदेच्या कार्यक्रमाइतकेच या राष्ट्रीय सेवा योजनेतही खर्च केले पाहिजे.

नगर शिबीर संपले. सर्व कार्यकर्ते आपापल्या गावी गेले. एकमेकांची पत्रे एकमेकांना येऊ लागली. आमच्या कॉलेजमध्ये उत्साहाने कार्याला सुरुवात झाली.

स. प. महाविद्यालयातील विद्यार्थीही जागृत झाला. एक दिवस ससूनमधील डॉक्टर्स बोलावले. १५० मुलामुलींनी प्रत्येकी ३०० C. C. असे सुमारे १५०० रु. किंमतीचे रक्त आपले जवान व रुग्ण बांधव यांच्यासाठी दिले. सारसबागेतील वाढलेले गवत एका रविवारी ५०।६० विद्यार्थी विद्यार्थिनींनी कापले – कॉलेजमध्ये

शिपायांसाठी प्रौढ शिक्षणवर्ग सुरू झाला. ससूनमध्ये मैदान साफ करणे, खिडक्या स्वच्छ करणे, टेबलांना रंग देणे ही कामे केली.

शेवटी दिनांक ८ ते ११ नोव्हेंबरपर्यंत हे श्रमवीर 'धायरी 'ला आले. पं. महादेवशास्त्री जोशी व भाऊसाहेब नातूंचे गाव. वडगाव ते धायरी असा सुमारे ५।६ फर्लांगाचा रस्ता करायचे ठरले. योजना नव्हतीच: झाले, जिल्हा परिषदेने २ ट्रक्स दिले, स्वतिकने त्यांचा एक ट्रक दिला, दगड–मुरुम रस्त्याच्या दुतर्फा टाकला गेला. हात राबत होते, उत्साह ओसंडून जात होता. पण या सर्वात काहीतरी कमतरता जाणवत होती. कार्य करणाऱ्यांच्या गटप्रमुखातही उणीव होती. आणि मुख्य म्हणजे सर्वजण एकदिलाने कार्य करत नव्हते. शिबीराचे जाणे येणे फुकट, जेवण फुकट, काम मात्र भरपूर. तरीही कामचुकारपणाला वाव. भरपूर वाव. मला ही 'लेबर आर्मी' वाटली.

आणखी एक काम ३।४ दिवस ह्या कोवळ्या मुलांनी–विशेषत: मुलींनी केले. कोणते ? घरोघर जायचे, 'बाई, तुमचा विटाळ गेला का ? तुमची पाळी अवेवट झाली का ? तुम्ही गर्भपात केला का ? तुमचे ऑपरेशन झाले का ? तुमची किती मुले मेली ?'–८।१० मुले व त्यांच्या जोडीला २५।३० मुलींचे हे पथक 'कुटुंब नियोजना 'च्या कार्यास मदत करण्यासाठी राबत होते. प्री. डिग्री आणि एफ. वाय.च्या पुण्यातील सुशिक्षित वर्गातील १६।१७ व्या वर्षातील मुलींना, 'बाई, तुम्ही कुटुंब नियोजनाची साधने वापरता का ?' असा प्रश्न विचारण्याची खरोखर हिंमत होत नव्हती. पण ही योजना बहुधा जिल्हा परिषदेकडून लादली गेली–२ ट्रक फुकट दिले होते ना दगड माती वाहायला ! मला या कृत्याचा संताप येऊनही मुकाट्याने हे काम करावे लागले. असे कार्य ह्या विद्यार्थ्यांना पुन्हा कृपया कोणीही देऊ नये, नाहीतर परिणाम विपरीत होईल.

समारोपाच्या भाषणात आपटे म्हणाले, 'आपण मुरुम, खडक आणून टाकला. हे ठीक आहे. मला जास्त समाधान वाटते ते ह्या गोष्टीचे, की ह्या पाठीमागे ग्रामीण बांधवांची सेवा करण्याची आपण तळमळ दाखविलीत, भावना दाखविलीत. त्या भावनेची सध्या जरुरी आहे. विद्यार्थी–विद्यार्थीनी खांद्याला खांदा लावून काम करताना पाहून आनंद वाटला.'

शिबीर संपले. घरी आलो. विचार केला की हे शिबीर एक नवीन पैसा कोणाला भरावा न लागता पार पडले. काम झाले भरपूर पण समाजकार्यात भावना किती जणात निर्माण झाली ?

हेच शिबीर जर १० रु. किंवा १५ रु. शुल्क ठेवून घेतले तर किती विद्यार्थी येतील ? म्हणून आवश्यकता आहे, ह्या योजना यशस्वी करणाऱ्या निष्ठावंतांची. ज्याला समाजकार्याची, निस्वार्थ समाजकार्याची आवड आहे, अशांनी ह्या योजनेत हिरीरीने भाग घेऊन ती यशस्वी करावी.

□ □ □



प्रभाकर
पेंढारकर

# वाढदिवस एका बुलंद बुरुजाचा

इंग्लीश भाषेत एक म्हण आहे.

“ ठोठावल्याखेरीज कोणी दार उघडत नाही ! ”

भारतीय चळवळींचं अलिकडचं हे एक सूत्र होऊ लागलंय.

आरडाओरडा केला, धाकदपटशा दाखवला, धमकी दिली की सारं मिळतं.

नाक दाबलं की तोंड उघडतं – इतकं साधं सोपं गणित ह्या मागण्यांच्या चळवळीमागं आता येऊन ठेपलं आहे.

वर्तमानपत्रात ठळक अक्षरात बातम्या येत आहेत.

“ देविकाराणी की शांतारामबापू ? ”

सरकारच्या फाळके पारितोषकाबद्दलच्या निवडीबद्दल असंतोष आज वर्तमानपत्रातून धुमसतो आहे.

पाच दिवसावर येऊन ठेपलेल्या राष्ट्रीय चित्र पारितोषक समारंभावर बहिष्कार घालण्याच्या गोष्टी चाललेल्या आहेत.

‘ ह्या अन्याय सहन केला जाणार नाही. ’ म्हणून वैयक्तिक मुलाखतीतून व्यक्त झालेली मते थोड्याच काळात सभातून घोषणा होण्याच्या उंबरठ्याप्रत पोहोचलेली आहेत.

गम्मत ह्यात ही की ज्यांच्यावरच्या अन्यायाबद्दल हा एवढा गदारोळ उठला आहे ते शांतारामबापू स्थितप्रज्ञाच्या नजरेने ह्या सर्वांकडे दुरून पहात आहेत.

पहाताहेत तरी का ?

तीही शंकाच आहे.

राजकमल
पडद्यावर
जे जे आले
ते ते
मी स्वतः
निर्माण केले.

असलं काही पहाण्याकरिता लागणारी सवड त्यांच्याकडे सध्या तरी नाही. नव्या चित्राचं प्रकाशन पुढच्या महिन्यात मेट्रो सिनेमात करायचं आहे. त्यापूर्वी संकलन, पार्श्वसंगीत, रिरेकॉर्डींग आणखीन किती तरी कामे संपवायची आहेत. इतर सर्व गोष्टी तूर्त गौण आहेत.

योगायोग असा की नेमका ह्याच वेळी – दि. १८–११–७० रोजी – त्यांचा वाढदिवस आला आहे.

माणसाच्या कर्तृत्वावर जर वाढदिवस साजरा करायचा असेल तर त्यांचा हा पन्नासावा वाढदिवस.

चित्रपट सृष्टीतली ही पन्नास वर्षे !

१९२० ते १९७० !

मूक चित्रपटापासून टेक्नीकलर–सिनेमास्कोप–स्टेरिओफोनिक साऊंडपर्यंतची !

ह्या साऱ्या स्थित्यंतरामध्ये बदलत्या काळाच्या ओघात वाहून न जाता खडा असलेला एक विरळा असामान्य चित्रकार.

शांतारामबापूंचं हे उभं रहाणं हे लव्हाळ्यासारखं परिस्थितीच्या प्रवाहाला पाठ देत उभं रहाणं नाही.

ते दीपस्तंभासारखं आहे.

ह्यांच्या पायाखालचा कणखर खडक हा स्वकर्तृत्वाचा अभेद्य खडक आहे. त्याचं यश हे नट, नट्या, लेखक, संगीत दिग्दर्शक किंवा गीतलेखक ह्यांच्या सहाय्यानं सामुदायिक खटाटोपानं मिळवलेलं यश नाही.

चित्रपट निर्मिती म्हणजे ' टीमवर्क ' असली सर्वांना खुष ठेवण्यासाठी निर्मिलेली

भलावणी ते वर्तमानपत्रांच्या मुलाखतीसाठी वापरात आणत नाहीत.

'जे पडद्यावर निर्माण केलं आहे ते मी केलं आहे!'

—हा त्या मागच्या जबाबदारीसह त्यांचा आत्मविश्वास आहे.

आणि प्रसंगी त्याला तडे जाऊन, काही ठिकाणी भगदाडे पडूनही तो अद्याप बुलंद बुरुजासारखा कायम आहे.

अशा माणसाच्या कर्तृत्वाचा वाढदिवस साजरा करणं हे मोठं कठीण काम आहे.

उदंड नाव आहे, किर्ती आहे. पैसा आहे. यश आहे.

ह्यांना सामान्य माणसांनी काय भेटी द्यायच्या?

सरकारनं कोणता किताब द्यायचा, काय सन्मान करायचा?

केव्हातरी जाग आल्यावर, कौतुकानं सरकारनं पद्मश्री किंवा पद्मभूषण जाहीर करायचं आणि शांतारामबापूंनी फटकन नाही स्वीकारत म्हणायचं!

तेव्हा वाढदिवस साजरा करायचा कसा?

त्यांच्या नातवंडांनी हा प्रश्न पटकन् सोडवून दाखवला.

नातवंडं आणि मुलं, मुली, सुना, भाचे आणि पुतणे, जावई!

चार दिवसापूर्वी त्यांच्या मयसभेसारख्या कार्यालयात सहा ते आठ वर्षांची चिमुकली फौज दाखल झाली; हिय्या करून म्हणाली—

'पपा, आम्हाला १७ तारखेला तुमची संध्याकाळ हवी आहे!'

'कशाला?'

'कशाला?'—हा प्रश्न तर अनपेक्षित, आईबाबांनी उत्तर पढवलेलं नाही.

चिमुरडी वैशाली म्हणते, 'मी पटकन आईला विचारून येऊ का? ती दारापलीकडं उभी आहे!'

पपा हसतात, म्हणतात, 'आईला कशाला विचारायला हवं. तूच सांग की!'

मग समीरा म्हणते, 'कशाला वगैरे काही नाही. आम्हाला संध्याकाळ हवी आहे!'

'कधीची?'

'सतरा तारखेची!'

मग पपांच्या एकदम लक्षात येतं.

'हे पहा मला वाढदिवस वगैरे साजरा केलेलं आवडत नाही.'

'बरं!'

'मी कुणाकडून 'प्रेझेंटस्' घेणार नाही. कुणी मला हार घालायचे नाहीत.'

'कबूल!'

'आणि तुम्ही जे काय करणार आहात ते फक्त घरच्यांच्या पुरतंच! बाहेर त्याचा गवगवा नको. कुणा बाहेरच्यांना आमंत्रणं नकोत!'

'कबूल. कबूल!'

'काय ग शुभदा...काय बेत आहे!'

पण मुलं उत्तर द्यायला थांबली कुठं? ती धूम धावत सुटली ऑफीसच्या दारा-पलीकडं लपलेल्या आपल्या आई-बाबा, पपा मम्मीकडं!

'हो पपांनी कबूल केलंय्...सतरा तारखेला, संध्याकाळी आपण सांगू तिकडं पपा येतील.'

मग गेले पंधरा दिवस गुपचूप चालू असलेल्या तयारीला एकदम उधाण आलं. मुलांनी शाळेला दांड्या मारल्या, बाबांनी ऑफिसला! फक्त चार-पाचच दिवस राहिले ना! पपांच्यासाठी काही करायचं म्हणजे व्यवस्थित व्हायला पाहिजे.

काहीतरी चालू आहे ह्याची चाहूल पपांना लागली. पण नेमकं लक्षात येईना. उत्सुकता तर होती, पण मुलांनी चकित करायचं ठरवलंय्...ठीक आहे...चकित होऊ या! पपांनी अधिक चौकशी केली नाही.

आणि एकदम सतरा तारखेची संध्याकाळ उजाडली.

ह्या नातवंडं मंडळीपैकी दोन चिमुकले सरदार पपांच्या ऑफिसात बोलावणं घेऊन हजर झाले.

स्टुडिओ पुरा भरलेला! पण ही तर घरचीच मंडळी दिसताहेत. पपा आले आणि प्रेक्षकामध्ये बसले.

पुढच्या रंगमंचावरचा पडदा सरकला.

रंगमंचावर एक सफेद दाढीमिशाधारी वयोवृद्ध साधू मायक्रोफोनपुढं उभा!

साधूची उंची दीड दोन फुट!

साधूच्या दाढीमिशाच्या जंजाळातून आवाज येऊ लागला.

'पपांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही नातवंडं मंडळींनी बालरामायण सादर करायचं ठरवलं आहे.'

पण ह्या साधूचा आवाज एवढा बायकी कसा काय?

कोण हा?

'आम्ही सर्व छोटी छोटी मुलंच हा कार्यक्रम करतो आहोत!'

ओळखलं!

ही नीता.

अवधूत भाऊची नात!

बाळासाहेब कन्नमवारांची कन्या!

'तेव्हा काही चुकलं माकलं तर ते विसरून हे चिटुकलं – मिटुकलं रामायण पपांनी गोड मानून घ्यावं!'

दिवे बंद झाले. तो साधू अदृश्य झाला.

परत दिवे आले तसा राजा दशरथ आपल्या पत्नीसह यज्ञकुंडाजवळ बसलेला दिसू लागला.

रामजन्म...
विश्वामित्रांच्या आमंत्रणानुसार वनागमन.
पुढे सीता स्वयंवर–!
ही सीता.
आपलीच नात – दुर्गा !
मधुराची मुलगी !
आणि रावण झालीय शुभदा.
आपल्याला विचारायला आलेली.
काशीनाथ दादांची नात !
लीना जटायू...
आणि चिमुरडी वैशाली – मंथरा !
हा महेश दिसतो खरा रामासारखा !

हे कौतुकाचे बोल पात्रांच्या भाषणापेक्षा प्रेक्षागारातून सुरुवातीला अधिक मोठ्यांदा ऐकू येत होते.

असा पात्र परिचय झाल्यावर प्रेक्षकांना नाटकात रस वाटू लागला. ही सव्वा-फुटाची मंथरा त्यांनी स्वीकारली.

बोबडं बोलणारा हनुमान आणि स्त्रीच्या आवाजाचा रावण त्यांनी मान्य केला.

प्रेक्षक नाटकात रंगले.

मी मात्र अण्णांच्याकडे पहात होतो.

फाळकेच्या कालियामर्दनपासून आजपर्यंतच्या सिनेमासृष्टीतल्या स्थित्यंतरांची कितीतरी धावती दृश्ये आजच्या ह्या प्रसंगाने त्यांच्या नजरेसमोर उभी राहिली असतील काय ?

ह्या छोट्यांनी रंगवलेल्या नाटकासारखी बाल्यावस्थेत असलेली मूक चित्रपट सृष्टी त्यांना आठवली असेल काय ?

का चित्रपट व्यवसायाचा विसर पडून त्यांचे मन ह्या वेळेपुरते ह्या चिमुकल्या नातवंडातच गुंतले असेल ?

माहित नाही !

मलाच काय, त्यांच्याबरोबर वर्षानुवर्षे काम केलेल्या सहकाऱ्यांनाही सांगता येणे कठीण आहे !

मी हाच प्रश्न मंगेश देसाईंना विचारला तसं ते म्हणाले–

'बाबारे, हा माणूस काय आहे हे अद्याप मला समजायचं आहे. ह्या वयात हे अगदी सहजतेनं वीसवीस तास एडिटींग टेबलवर तंद्री लावून बसू शकतात.

त्यांचा आत्मविश्वास, कामाची तडफ, उत्साह आणि अद्यापही काही नवीन करण्याची जिद्द आपल्यातरी आकलनशक्ति पलीकडची !'

ह्या मंगेश देसाईंचा अण्णांच्या बरोबरच्या कामाचा अनुभव फक्त वीस वर्षांचा. अधिक अनुभवी म्हणून मी संगीत दिग्दर्शक वसंतराव देसाईंच्याकडं वळलो.

'खरं सांगू का, सरकारनं अण्णांना पारितोषक दिलेलं नाही ही एक फार चांगली गोष्ट केली.'

मी प्रश्न विचारण्यापूर्वी ते स्वतःहून सांगू लागले.

'कारण त्यामुळं माणसाची योग्यता अगदी इंच, सेंटीमीटर्सच्या पट्टीत मोजली जाते. हे पारितोषक न मिळाल्यानं अण्णा आम्हाला कितीतरी मोठेच वाटत राहतात!'

रंगमंचावर नाटक चालूच होतं.

कैकयीचा हट्ट...रामाचा वनवास.

भरत भेट...कांचन मृग...

रावण भिक्षेकऱ्याच्या वेषात...

ह्या रावण झालेल्या शुभदेनं चिमुरड्या सीतेला काखोटीला मारून पळवलं.

छोट्या हनुमानानं साऱ्या माकडांना मर्कट चेष्टात हरवलं आणि लंका पेटवून दिली.

समुद्र पार करून महेश रामाच्या रूपानं लंकेत आला.

राम रावण युद्ध!

युद्धाचं संगीत संपलं तरी हा रावण मरेचना!

दिग्दर्शक मधुरा पडद्यामागून शुभदेला दटावते आहे.

—मग रावण वध!

पडदा पडला.

अण्णा उठले. पंचविशीतल्या चपळाईनं रंगमंचावर चढले.

त्यांनी हनुमानाला उचलून त्याचा मुका घेतला. रावणाच्या पाठीवर शाबासकी दिली. सीतेला त्यांनी कडेवर घेतलं आणि ह्या सगळ्या नातवंडामध्ये ते कौतुकानं उभे राहिले. लख लख फ्लॅशबल्ब पेटले. कॅमेऱ्यांनी तो क्षण टिपला.

मधुरा शांतारामबापूंची मुलगी—बाहेर आली आणि म्हणाली, 'हे काय पपा, आमचा कार्यक्रम अजून संपायचा आहे.'

'असं असं...सॉरी.'

पपा परत प्रेक्षकात जाऊन बसले.

एक एकांकिका सुरू झाली.

त्यात मधुरा, बाळासाहेब कन्नमवार आणि गिरीशनी कामे केलेली!

नातवंडांच्याकडून आता मुलांनी आणि सुना—जावयांनी स्टेजचा ताबा घेतला.

एकांकिकेनंतर शंकर पार्वती संगीतिका!

कोणत्याही व्यावसायिक संस्थेचा प्रयोग फिका वाटावा असे सुरेख नृत्य

बसवलेले ! श्री. सचिन शंकर ह्यांनी ह्या अनुभवी मंडळींना मार्गदर्शन केलं होतं ! तेजू–राजश्रीची बहिण व ज्योती–अण्णांची सून ह्या दोघी सोडल्या तर ह्यापैकी कोणीही नृत्य शिकलेलं नाही. पण कलेचा वारसा हा आपोआपच मागच्या पिढीतून पुढच्या पिढीपर्यंत पोहोचलेला !

कार्यक्रम संपला !

पपांना मग स्टेजवर बोलावलं. सौ. विमला काकींनी पन्नास निरांजनाचं लख-लखतं कमळ आणलं आणि अण्णांना ओवाळलं !

ही पन्नास निरांजनं–चित्रपट सृष्टीतली अण्णांची पन्नास तेजस्वी वर्षं !

नातवंडं, लेकी–सूना, भाचे, पुतणे, जावई कोणी काही द्यायचं नाही हा वायदा होता. सर्वांनी खाली वाकून नमस्कार केला. मोठाली गुलाबाची सुवासिक फुलं त्यांच्या हाती दिली.

किरण म्हणाला, 'आता पपांच्याकडं एक मागणं–त्यांनी आम्हाला दोन शब्द सांगावेत !'

अगदी अनपेक्षित मागणी ! अण्णांनी मायक्रोफोन हाती घेतला. गदगदलेला आवाज साफ केला आणि अण्णा बोलू लागले.

पहिली आठवण झाली ती आई–वडिलांची ! राजारामबापू आणि कमलाबाई ! ज्यांच्या नावातून 'राजकमलचा' जन्म झाला.

'माझ्यात जे काही कलागुण आले असतील ते त्यांच्यापासून. हा आमच्या पिढीचा वारसा...तुमच्यापर्यंत आपसूक पोहोचलेला आज पाहिला. प्रत्येक गोष्ट काटेकोरपणे पाहाणाऱ्या आणि कुठंही तडजोड न स्वीकारणाऱ्या माझ्याकडूनही तुम्ही 'वाहवा' मिळवलीत ह्यातच ह्या कार्यक्रमाचं यश !

तुम्ही मला हार घातलेत...गौरवलेत.

ह्या हारांचं ओझं बाळगीत मला चालायचं आहे. तुमच्याबरोबर ... काळाबरो-बर ! आणि तसा मी चालेन. जें केलं त्यापेक्षाही आणखीन काही तरी भव्य करेन हा मला आजही आत्मविश्वास आहे...'

...सत्तर वर्षांचा अनुभव अण्णा आपल्या कुटुंबियांना, सहकाऱ्यांना, मित्रांना, हितचिंतकांना सांगत होते. एक उज्वल वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिला जात होता.

अद्याप सरकारी पारितोषक वितरण समारंभास पाच दिवस आहेत. योग्य निवड कोणाची ह्याबद्दलची भांडणे आणि वाद वर्तमानपत्रातून आता सभेपर्यंत पोहोचतील. समारंभावर बहिष्कार घालतील, न घालतील. सरकार कधीतरी जागे होईल अथवा न होईल. अण्णांच्या सत्काराचा समारंभ त्यांच्या नातवंडांनी केव्हाच साजरा केलेला आहे.

□ □ □

# फुलवाणी

मालती मराठे

लेखक महाशय फार कडक स्वभावाचे आहेत, त्यांची मतं तऱ्हेवाईक आहेत, स्वतःला पटलेली गोष्ट समोरच्या माणसाला कसलीही भीडभाड न ठेवता ते सांगत असतात, फार कमी बोलतात वगैरे वगैरे ऐकलेलं होतं. त्यामुळे त्यांची लेखनिक म्हणून काम करायचं ठरवलं तेव्हा मन थोडं धास्तावलेलं होतं.

पण आठ पंधरा दिवसात मी त्या कामात चांगलीच रुळले. साधारण दुपारी बारच्या सुमारास मी त्यांच्याकडे जायची. सातपर्यंत लेखन चालायचं...मी खिडकी शेजारच्या टेबलाजवळ...ते भिंतीजवळच्या आरामखुर्चीत, शेजारीच टीपॉयवर सिगरेटचं पाकीट, लायटर...मजकूर सांगताना मधूनच त्यांच्या कपाळावर एक उमी आठी उमटून जायची...मागे टेकून डोळे मिटून संथ आवाजात ते बोलत असायचे...मी लिहून घ्यायची.

संभाषण असं फारसं व्हायचंच नाही. क्वचित त्यांना कुणी भेटायला आलं तर तेवढा वेळ मी पुस्तकांच्या कपाटांनीच बनविलेल्या केबीनवजा खोलीत बसायची...काहीतरी वाचीत...मला अलिबाबाची गुहाच भेटल्यासारखं वाटायचं अगदी...कधीकधी लेखन चालू असतानाच बेल वाजायची...जरा थांबून थांबून अशी तीनदा-आणि ते उठून आत जायचे, त्यांना घरात बोलावून घेण्यासाठी संकेत असावा तो. पण मला राहून राहून एका गोष्टीचं नवल वाटायचं की इतके दिवसात घरात लहान मुलाचा किंवा बाई-माणसाचा वावर असल्याचं कधीच कसं दिसलं नाही ?

अंगणातल्या बागेत माळी कधीमधी दिसायचा, कधी बाजारहाट करुन किंवा लॉंड्रीतून कपडेबिपडे घेऊन आलेला गडी दिसायचा...एरव्ही घरात अगदी शुकशुकाट...त्या बेलचा, घड्याळाच्या टोल्यांचा किंवा दुरुन जाणाऱ्या येणाऱ्या

वाहनांचा तेवढा आवाज...मला प्रश्न पडायचा हे एकटेच राहातात की काय? पण मग ती बेल? कधीकधी ऐकू येणारी?

एक दिवस कसं कुणास ठाऊक मी त्यांना म्हणाले,

"एक विचारू का?"

त्यांची मुद्रा प्रश्नार्थक झाली. कपाळावर ती उभी आठी आली. मी जरा बिचकलेच...

"अं? तुमच्या मिसेस् दिसल्या नाहीत कधी? कुठे बाहेरगावी वगैरे गेल्या आहेत का?"

"इथंच आहे की"

"मग माझी ओळख द्या की करून त्यांच्याशी"

"ओळख...?" असं म्हणून ते क्षणभर घुटमळले आणि म्हणाले,

"आजच का विचारावसं वाटलं?"

"नाही, पूर्वीच वाटलं होतं. पण धाडस मात्र आज केलं"

मी जरा धीटपणानं उत्तर दिलं. ते उठले...त्यांच्या पाठोपाठ मीही आतल्या खोलीत गेले...मागे स्वयंपाकघर, देवघर असावं, खोलीत वर जाण्यासाठी जिना होता. आम्ही माडीवर गेलो, दिवाणखान्याच्या पलीकडे एक खोली होती.... खिडकीजवळ पलंगावर बाई झोपलेल्या होत्या...अस्थिपंजर...फिकट चेहरा, डोळे मात्र कमालीचे तेजस्वी, आणि गुडघ्यापर्यंत पोहोचतील एवढे लांबसडक, दाट केस...उशागती वेगवेगळ्या आकाराच्या फुलदाण्यातून सुंदरपैकी पुष्परचना केलेली होती.

मी पुढे होऊन नमस्कार केला, माझं नाव सांगितलं. जरा भिंतीच्याकडेला सरकल्यासारखं करून त्या म्हणाल्या,

"हो, हे सांगत होते तू अलिकडे ह्यांच्यासाठी काम करतेस. ये, इथं बैस पोरी माझ्याजवळ..."

मधानं ओथंबलेल्या त्या शब्दांनी भारल्यासारखी मी त्यांच्याजवळ जाऊन बसले आणि पलंगाच्या पायगती ठेवलेली चाकाची खुर्ची मला दिसली. काळजात कसं चर्रं झालं,...काही बोलणंच सुचेना...लेखक महाशय हळूच तिथून निघून गेलेले होते. त्या हसून म्हणाल्या,

"तू मला भेटायला आलीस...बरं वाटलं"

उशीवर त्यांचे मोकळे केस रेशमाच्या लडीसारखे दिसत होते...मुलायम, तुकतुकीत पिंगट रंगाचे...केसांचा असा सोनसळी रंग कधी पाहाण्यात आलेला नव्हता. मी अभावितपणे बोलून गेले,

"तुमचे केस फार म्हणजे फारच सुंदर आहेत बाई,"

मांजरीच्या पिल्लाला कुरवाळावं तसं आपल्या केसांना हळुवारपणानं गोंजारीत



त्या मिस्किलपणे म्हणाल्या,

"माझ्या एकेकाळच्या सुंदरपणाची तेवढीच एक मिजास माझ्याजवळ उरली आहे"

क्षणभर त्यांचा चेहरा गंभीर झाला आणि लगेच समजावून सांगण्याच्या सुरात त्या बोलू लागल्या,

"तुला सांगू का ? मलाही कधीकधी आश्चर्य वाटतं की माझे हे केसच तेवढे अजून कसे सुंदर राहिलेत ? तुला नार्सिससची गोष्ट माहीत आहे ?"

"हो, पाण्यातल्या आपल्या प्रतिबिंबावर..."

"जगातल्या सगळ्याच सुंदर गोष्टी अशाच स्वतःवर लुब्ध होऊन जगत असाव्यात...स्वतःच्या रूपावर प्रेम करणं एवढंच निमित्त जगण्यासाठी त्यांना पुरतं, माझे केसही तसेच आहेत. आता मी अशी पांगळी होऊन पडलेय नं ? तरी ते

आपले वाढताहेत, अधिकाधिक सुंदरच होताहेत..."

मी त्या केसांवरून एक हलकासा हात फिरवला, त्या मजेशीरपणे हसल्या, म्हणाल्या,

" अग, हे माझ्या या केसांवरच भाळले होते आणि माझ्या प्रेमात पडले होते बरं का? मी परवा ह्यांना सांगितलंय् की ज्यावेळी मी हे जग सोडून जाईन..."

नकळत त्यांच्या ओठावर हात ठेवून मी म्हटलं,

" पुरे, पुरे; मरणाच्या गोष्टी कशाला करायच्या त्या ?"

त्या माझ्याकडे एकटक पाहात राहिल्या. मी अस्वस्थ झाले. त्या म्हणाल्या,

" का कुणास ठाऊक आज मला खूपखूप बोलावसं वाटतंय, अग, इथं अशी एकटी पडलेली असते...केव्हाकेव्हा मनात मोठे गंमतीशीर विचार येत असतात, माणसं माझी कीव करतात. पण तुला एक सांगते, तुम्हाला कुणाला आयुष्यात कधी अनुभवायला मिळणार नाहीत असे सुंदर क्षण मला इथं बसल्याजागी मिळतात. तुला विचित्र वाटतंय् का माझं बोलणं ?"

मला वेगळंच कुतुहल वाटायला लागलं, या चार भिंतीच्या आत कुठलं रोमांचकारी विश्व यांच्यापुढे साकार होत असेल, की त्यामुळे आपल्या उणीवेचाही त्यांना विसर पडावा ? मी काही उत्तर दिलं नाही, एक तृप्त निश्वास टाकून त्यांनी आजूबाजूला नजर फिरवली आणि त्या म्हणाल्या,

" उदाहरणार्थ.. ती फुलं बघ, पाहिलीस ? ती आपापसात बोलत असतात. मी ऐकलंय...तुला माहित आहे फुलं बोलतात ते ? कदाचित असं असेल, मी त्यांच्या सतत सहवासात असते ना म्हणून त्यांचं बोलणं मला समजायला लागलं असेल... पांगळेपणाचा एक फायदा असतो बघ. आपलं मन अगदी मुक्तपणे वावरू शकतं... बाहेरच्या जगात नाना उपाधी माणसाला जखडलेल्या असतात. त्यांनी मन गुदमरून जातं. होय की नाही ? मी वेड्यासारखी काहीतरी बडबडतेय का ?"

मी म्हटलं,

" नाही, नाही, तुम्ही बोला..."

मनातल्या मनात मी चूर होऊन गेले होते. फुलांचं संभाषण होऊ शकतं हा विचारही कधी माझ्या मनाला शिवलेला नव्हता आणि ह्या बाई, जागेवर खिळलेल्या, एखाद्या पंडिताला लाजवील असे विचार बोलून दाखवत होत्या. मला त्यांच्या बोलण्यात वेगळाच रस वाटू लागला. त्या खिडकीबाहेर नजर टाकून म्हणाल्या,

" माझी बाग पहात असशील रोज तू. एकेकाळी माझ्या हातानं मी तिथं फुलझाडं लावली आहेत, स्वत: खतपाणी घालून वाढवली आहेत...हे आता माझ्यासाठी जीवापाड तिची जपणूक करतात. फुलांचं मला वेड आहे अगदी...तो...त्या फुलदाणीतला गुलाब पाहिलास ?"

भिंतीपासच्या एका गोल टेबलावर नक्षीदार फुलदाणीत गुलाब होता. लाल काळसर रंगाच्या मखमली पाकळ्या, त्या फुलपाखराच्या पंखासारख्या बाकदार होत्या. कौतुक भरल्या स्वरात त्या सांगू लागल्या,

"बघ किती सुंदर आहे तो...आहे ना ? फुलांनासुद्धा व्यक्तिमत्व असतं, हा गुलाब खानदानी आहे. फुलांमध्येसुद्धा माणसांसारख्या जाती असतात बरं का ! आता हा गुलाब इथं आला तेव्हा कळीच्या रूपात होता. म्हणजे हळूहळू फुलत होता. पण त्याची वाढ खुरटलेली होती. जगेल की नाही कुणास ठाऊक असं वाटलं मला...गडी माणसांची कामं अशीच...कुणीतरी धसमुसळेपणानं तोडून त्याला अॅस्टरच्या, झेंडूच्या गुच्छात जखडून टाकलं होतं...छे छे ! जीवघेणाच प्रकार तो ! झेंडू, अॅस्टर कसली उग्र फताडी गंधहीन फुलं ती...गुलाबाला काय त्यांच्यात राहाणं मानवणार आहे ? तो गुच्छ इथं टेबलावर होता...माझं पहिल्यांदा लक्षच गेलं नाही...मला जरा डुलकी लागत होती आणि एकदम कसलातरी गलका ऐकू आल्यासारखं वाटलं. कोण भांडतंय कुणास ठाऊक–मग पाहिलं तर ही फुलं...रागारागानं बोलत होती...कुणाला तरी चिरडून टाकण्याची भाषा...

मी ह्यांना बोलावून घेतलं. आधी चाकाशी खुर्ची गाठली आणि जाऊन पाहिलं तर बिचारा गुलाब, त्या रानवट फुलांच्या घोळक्यात एकटाच गुदमरलेला. त्यानं मान टाकली होती. निस्तेज झाला होता अगदी..."

त्या थांबल्या. प्रेमभरानं वाऱ्याच्या झुळुकीबरोबर डुलणाऱ्या गुलाबाकडे पाहात राहिल्या. मी विचारलं, (मीही रंगून गेले होते.)

"मग ? पुढं काय झालं ?"

"मग काही नाही, मी स्वतः त्याला बाहेर काढलं आणि आधी या फुलदाणीत

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

**दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.**


वेगळं ठेवलं, ॲस्पिरीनची अर्धी गोळी दिली. गुलाबासाठी ॲस्पिरिन फार चागलं— तसं फुलांफुलांवर अवलंबून असतं, काहींना तांब्याचा पैसा आत टाकावा लागतो, काहींना ब्रँडी हवी असते, काहींना लिंबाचा रसदेखील चालतो. तर, तो गुलाब लवकरच सुधारला आणि त्यानं चांगलंच अंग धरलं..."

फुलाफुलांचे वेगळे प्रकार, प्रत्येकाची अनुपानं वेगळी...मला हे सारं नवीन होतं...फुलांचंदेखील माणसांसारखंच दिसतंय...उगाच गर्दी झालेली, कुठलीकुठली चालतू माणसं जवळ आली की आपल्याला कसं उबगल्यासारखं वाटतं – फुलांनाही वाटतं का ?

एवढ्याशा बोलण्यानंही त्यांना थकवा आलेला दिसत होता. माझा हात हातात घेऊन स्नेहभरानं त्या म्हणाल्या,

"बरं वाटलं, पुष्कळ दिवसांनी मनमोकळं बोलायला मिळालं. पण मी एकटीच बोलत होते. तू काहीच बोलली नाहीस ? आज तुझा कामाचा वेळ मी घेतला... बरं, ये हो परत केव्हातरी अशीच ? अंधारून येतंय. पाऊस कोसळायच्या आत घरी सुखरूप पोहोचलीस म्हणजे बरं. ये...अग, मला जरा खुर्चीत बसवतेस ?"

मी तत्परतेनं मदत केली...त्यांच्या रेशमी केसांवरून हलकेच हात फिरवला. दरवाजाशी जाऊन हळूच मागे वळून मी त्यांचा निरोप घेतला...त्यांनी खुर्ची ढकलत ढकलत टेबलापाशी नेली होती...त्यांनी हात वर करून हसून पाहिलं, त्यांची हिऱ्याची अंगठी त्यांच्या डोळ्यांसारखीच चमकली...आणि त्या अंधुक प्रकाशात मला वाटलं...विश्वास बसणार नाही कुणाचा पण...खरं खरं वाटलं की, एखाद्या सिंहासनाधिष्ठित राणीप्रमाणे तिच्याभोवती मानकरी गोळा झालेले आहेत—ती त्यांना उद्देशून भाषण करते आहे आणि तिचा लाडका गुलाब दरबारी थाटात तिच्याजवळ उभा आहे....खरंच...



पुस्तके

सौ. मालती पतकी

# वाळवंटातील वाट

वाळवंटातील वाट ही कादंबरी वाचायला घेण्यापूर्वी ती कशी आहे याची साधारण कल्पना मनात होतीच. कारण आकाशवाणीवर बुधवारच्या गृहिणीमधून एकेक प्रकरण ऐकले गेले होते. परंतु एका टप्प्यात सर्व कादंबरी वाचल्याने तपशील जास्त चांगला समजला. १२८ पानी अन् दहा प्रकरणे असलेली ही कादंबरी खरोखरच उत्कृष्ट अशीच गणली जाईल. त्या संदर्भात नऊही लेखिकांचे मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते. प्रत्येकीने एकेक प्रकरण लिहून सुद्धा प्रत्येक प्रकरणाचा धागा एकात एक अगदी बेमालूम गुंफला गेला आहे व कथानकाला कुठेही धक्का न लावता हे कादंबरीचे वस्त्र अतिशय तलम पोतात विणले गेले आहे. एक प्रकरण वाचून झाल्यावर आता पुढे काय ही वाचकांची उत्सुकता शेवटपर्यंत कायम राहते. शिवाय कथानक रंगवण्याची वाङ्मयीन कुवत प्रत्येकीच्या प्रकरणात दिसून येते. विशेषतः पहिले आणि दुसरे प्रकरण लिहिणाऱ्या लेखिकांनी कादंबरीचा पाया, की ज्यावर पुढील सर्व इमारत भक्कमपणे उभी राहवी, तो फार उत्तम रीतीने घडविला आहे.

कादंबरीची नायिका रोहिणी आहे हे निश्चितच, पण कादंबरी वाचता वाचता गौरी ही मुख्य पात्र आहे का असा संभ्रम मनात उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे मुखपृष्ठावरील चित्र गौरीचे

की रोहिणीचे ? ही शंका मनात येते. परंतु रोहिणीला दिलेली सुवर्णाच्या कळसाची उपमा लक्षात घेता वाळलेले झाड जवळ असूनसुद्धा ती रोहिणी असावी असे वाटत नाही. कारण आपल्या प्रखर व्यक्तिमत्त्वाने तिने आपले आयुष्य कुणाचाही आधार न घेता स्वतःच वाळलेले झाड बनून जगवले. उलट गौरीला जगदीशचा आधार होता. तिने तुडवलेल्या 'वाळवंटातील वाटेत' हा आधार वाळलेल्या झाडासारखा शुष्क दाखवला नसता तर नक्कीच ती गौरी आहे हे समजले असते.

स्त्रियांच्या समस्यांवर लिहिलेली ही कादंबरी, स्त्रीमनाचीच पकड घेते हे निश्चितच पण पुरुषपात्रेही, एक नारायण सोडता इतकी चंचल आणि लंपट रंगवून एक प्रकारे पुरुषवर्गाचा रोषच लेखिकांनी ओढवून घेतला नाहीना ? अशी शंका मनात येते.

## मध्यवर्ती कल्पना

रोहिणी, नलिनीबाई, गौरी ही या कादंबरीतील तीन मुख्य स्त्री पात्रे व झुबेदा, मंदा ही त्यांच्याशी संलग्न स्त्री पात्रे. रोहिणीच्या मातृत्वाला कुठेही कलंक न लागता तिला गौरीच्या रूपांत अपत्य लाभ झालेला असतो. परंतु नंतर झुबेदा तिच्या संसारसुखाच्या आत आल्याने तिच्या संसाराचे ओसाड वाळवंट होते. तीच गोष्ट मंदाच्या बाबतीत. कलंक विरहित मातृत्व पण पतीची बेछूट वागणूक म्हणून घराचा त्याग ! परंतु नलिनीबाई व गौरी यांना प्राप्त झालेले मातृत्व मात्र अनीतिच्या सदरात मोडेल असे ! परंतु गौरी त्याला अनीती म्हणायला तयार नसते कारण विवाहबंधनातच नीती आहे हे तिला मान्य नसते. परस्परांवरील शुद्ध प्रेम तिला नीती अनीतीच्या गोंधळात शिरू देत नाही. या तिच्या मनाला, कोणाचाच विशेषतः रोहिणीचा—तिच्या आईचाच विरोध असल्याने ती वाळवंटातील वाटेनेच जात असते.

परंतु नलिनीबाई मात्र स्वतःला दूषण देत झालेला व्रण बुजवित कुणावर तरी मायेची पाखर घालून आपले आयुष्य जगवत असतात. पण मनात मात्र रखरखीत वाळवंटातील एकाकी वाट तुडवत असतात.

रोहिणी ही अतिशय करारी, प्रखर व्यक्तिमत्त्वाची व शिस्तप्रिय वागणुकीची व्यक्ती ! झुबेदामुळे प्रभाकरपंताचा तोल जाऊन सुद्धा त्यांना झालेल्या चुकीचा पश्चाताप होतो आहे व रोहिणीबद्दल त्यांना किती ओढ आहे, हे, ते तिला नाना प्रकारे आर्जव करून घर सोडू नको सांगतात त्यावरूनच दिसून येते. पण चुकीला क्षमा नाही याच एका हट्टीपणाने त्यांच्याही आयुष्याचे रोहिणी ओसाड वाळवंटच करते ! हे त्यांच्याच शेवटच्या आजारपणात रोहिणीला आलेल्या चिठ्ठीवरून समजते !

याउलट नलिनीबाई 'लग्न करून आपण सुखी होऊ व झालेल्या चुकीला उजळ माथा देऊ' असा सल्ला सांगत असताना सतारीच्या मास्तरांचे ( नलिनी-

बाईच्या प्रियकराचे ) पात्र, विश्वामित्री आव आणन, वडील सांगतील त्यांच्या गळ्यात माळ घालून सुखी होण्याचा सल्ला देतात व मोकळे होतात व नलिनीबाई वाळवंटातील वाटेत सहभागी होतात.

गौरी आणि जगदीश मात्र विवाहबंधनात अनीती नसते व विवाहबंधनाशिवाय रहाण्यात ती असते याचा विचारसुद्धा न करता विवाहबंधनाशिवाय राहून आपण शुद्धच आहोत असे समजून नीतीच्या कल्पनांना मूठमाती देऊन वाळवंटातील वाटच जगत असतात. अशी ही नीती अनितीचा उहापोह करणारी कादंबरीची मध्यवर्ती कल्पना!

## ठिसूळ चर्चा

गौरीच्या मनातील नीतीची कल्पना समाजाला कितपत मानवेल ही रोहिणी-च्याच मनातील भीती वाचकांच्या मनात उभी रहाते. कारण समाज स्थिर अव-स्थेत व एका सांकेतिक जडण घडण स्वरूपाचा असेल तरच समाजाची घडी विस्कळीत होत नाही. आणि तो तसा रहाण्यासाठीच विवाहसंस्थेचा पाया घातला गेला. तो पायाच जर ढासळला तर अमेरिकन हिप्पी संस्कृतीची आकृती भारतात होण्यास काय वेळ लागणार? जगदीश गौरीसारखी जोडपी पूर्वीही होती, पुरा-णातही होती व आजही असतील पण समाज त्यांचेकडे 'कलंकिता' या दृष्टीनेच पहाणार! भारतीय लोकांच्या मनातील नीती अनीतिच्या कल्पनांचे उच्चाटन होणे सहज शक्य नसल्याने जगदीश गौरीचे वैवाहिक आयुष्य अशा रीतीने शुद्ध म्हणवून घेण्यास समाज तयार होईल असे वाटत नाही. २५ वर्षाच्या कालावधीनंतरही ही परिस्थिती येईल असे वाटत नाही. आपण नाही असे वागलो, पण आपल्या मुली, नाती, पणती अशा वागल्या तरी चालतील, असे तर लेखिकांना सुचवायचे नाही ना? का गौरी-जगदीशसारख्या केवळ प्रेमाने आंधळे झालेल्या जोडप्यावर कुणी शितोडे उडवणार नाही; इतका समाज बंधनाच्या पलीकडे जाऊन धीट होणार आहे अशी सर्वजणींची कल्पना आहे? का पुढे एक काळ असा येईल, हे गृहीत धरूनच त्यांनी गौरीचे पात्र रंगवले?

गौरीच्या म्हणण्यात तथ्य आहे असे नारायण परांजपे का म्हणतो? का त्याचेही आयुष्य त्याने याच चौकटीत बसविलेले असेल? याचे स्पष्टीकरण जर या लेखि-कांनी केले असते तर नारायण परांजप्याच्या म्हणण्यात तथ्य आहे असे म्हणता येईल. अन्यथा कादंबरीतील नीती अनितीची चर्चा ठिसूळ वाटते.

नारायण परांजपे ही एकच व्यक्ती रोहिणीला ओळखू शकते. परंतु त्यांच्या सांसारिक जीवनाची चौकशी करून त्यांच्या मनात शिरण्याचा रोहिणी काहीच प्रयत्न करीत नाही. बहिणीच्या नात्यानेसुद्धा! उलट त्यांच्या प्रेमळ वागणुकीचीच दहशत घेऊन स्वतःला शिक्षा करून घेते! एकूण चार तऱ्हेने चार माणसे आयुष्य

जगत असतात. रोहिणी कठोरपणे, गौरी स्वच्छंदपणे, नलिनीबाई मायाळूपणे नारायण हसत खेळत, कुठल्याही गोष्टीकडे गंभीरपणे न पहाता!

कादंबरी वाचताना पहिली गोष्ट खटकते की, नलिनीबाई आणि जगदीश यांनी चंदनपूर ते हरग्राम बरोबर प्रवास करूनसुद्धा त्याच्या गळ्याच्या घाटीतील तुळशी-पत्र त्यांना कसे दिसले नाही? दुसरे म्हणजे भाईसाहेबांकडे जगदीश कसा आला? गंगामाईला अर्पण केल्यानंतर! शिरीषला बघून गौरीला जगदीशची आठवण होते. पण जगदीशला पाहून नलिनीबाईंना काहीच उचंबळून येत नाही. येते ते एकदा तुळशीपत्र दिसल्यावर, परंतु प्रवासात असताना त्याच्या चेहऱ्या-मोहऱ्याची कुठेच सांगड त्यांच्या मनात जुळून कशी येत नाही? तिसरी ही की जगदीश गौरीचे संबंध माहीत असूनसुद्धा मंदा आपल्या मुलाला तिच्या शाळेत घालील हे शक्य वाटत नाही. जिने घर सोडले ती मुलालाच त्या घरात कशाला घेऊन जाईल? गौरीच्या पोटातले बाळ गेले ही बातमी स्टेशनवर सांगणे म्हणजे एक बावळटपणाचाच नमुना वाटतो! पहिल्या प्रकरणात चंदनपूर ते हरग्राम हा प्रवास २ दिवस २ रात्रीचा सांगितला आहे. जरी ही गावे काल्पनिक असली तरी यु. पी. मधल्या कुठल्याही गावात जाण्यास इतका वेळ नक्कीच लागत नाही.

अर्थात हे बारीक दोष असले तरी त्यामुळे कादंबरीचा वाङ्मयीन दर्जा मुळीच कमी होत नाही. एकूण ही प्रादेशिक कादंबरी वाचकांसमोर आणण्यात सर्व लेखिकांचे सहकार्य व एकी हेच गुण मुख्यत: दिसून येतात. अशाच प्रकारचे संघटित वाङ्मय निर्माण झाल्यास तो एक महिलांचा विशेष गुण प्रकर्षाने दिसून येईल व आणखी एक कल्पना अशी की या कादंबरीवर एक चित्रपटसुद्धा काढता येईल. नाहीतरी अलीकडील हिंदी चित्रपटांची हीच पार्श्वभूमी दाखविलेली असते. तसेच हे एक वैचित्र्यपूर्ण कथानक होईल. सर्व लेखिकांचे अभिनंदन. ◻◻

---

**वाळवंटातील वाट।** संजय प्रकाशन : पृष्ठे १२८ : चार रुपये.

लेखिका: सौ. पद्मावती गोळे, सौ. अंजली ठकार, सौ. कमला वाघ
सौ. मृणालिनी जोशी, सौ. शांता किर्लोस्कर
सौ. सुधा साठे, सौ. शैलजा राजे, सौ. ज्योत्स्ना देवधर
सौ. विद्या बाळ.

---

श्रीकांत आंबेकर

# दूरचे तारे

## लेखांक एक

गोष्ट आहे गिरसप्प्याची. काही पाखरांची अन् माणसाच्या स्वार्थाची! त्या धबधब्याच्या मागे खडकाच्या खबदाडीतून कितीतरी पाखरे गुण्यागोविंदाने राहतात. दररोज इकडे तिकडे फिरून ती स्वतःसाठी दाणा शोधतात. आणि छोटया मोठ्या खबदाडीत साठवून ठेवतात. पण बिच्चाऱ्या त्या पाखरांचे श्रमसायास अगदी वाया जातात. कारण दर वर्ष–सहा महिन्यानी म्हैसूर सरकार धान्याचे हे अनाधिकृत साठे 'जप्त' करून लिलावात विकते.

माणसाची ही सवय काही आजची नाही; किंवा अन्नधान्यापुरतीच ती मर्यादित आहे असंही नाही. गेल्या कित्येक शतकांपासून तो स्वतःला लागणाऱ्या सर्व वस्तू मिळतील तेथून; 'भगवानने जो भी बनाया है, अपनेही लिये तो है' अशा रुबाबात चक्क लांबवीत आला आहे. त्याच्या भोवतालच्या निसर्गानं साठवून ठेवलेली शक्ती स्वतःसाठी निःसंकोचपणे राबवीत आला आहे.

वाऱ्यामधल्या यांत्रिक शक्तीला वेठीला धरून त्याने आपल्या पवनचक्क्यांमधली जात्यांची तळी फिरवून घेतली आहेत. सूर्यापासून पृथ्वीकडे वाहणारा सौरशक्तीचा पूर पानापानातून शोषून, त्याला रासायनिक शक्तीत रूपान्तरित करून, फळांच्या रूपाने ती साठविणाऱ्या वृक्षवल्लरींच्या तोंडावर 'वा, वा! खरंच किती थोर आहेत या वनस्पती! फळ निर्माण करतात पण स्वतः मात्र चाखतसुद्धा नाहीत!! केवढ्या परोपकारी!!!' अशी खुशामत करून हळूच त्यांना लुबाडत आला आहे. उंचावरून खाली पडणाऱ्या पाण्याला मोठमोठी टरबाइन्स फिरवायला लावून तो वरदायिनी वीज निर्माण करीत आला आहे; आजही करतो आहे.

प्रगतीच्या या झपाट्यात पेट्रोल, कोळसा, लाकूड आदि मंडळी मात्र छान खमकी भेटली त्याला! आपली रासायनिक शक्ती दडवून ठेऊन, शहाजोगपणे हात

झाडीत, 'आपुन गरीब मानसं. आपनापासी आयच्यान् काय नाय सायेब' असं म्हणत ती पुढं आली. आता याना जऽऽरा 'अँन्टी करप्शन'चा हिसका दाखवला तर भरपूर 'काळी' शक्ती मिळेल हे काय मानवाला माहित नव्हतें होय? पण त्याने वेगळीच युक्ती लढविली. गालातल्या गालात हसत हळूच त्याने हुकूम दिला, 'ही मंडळी सपशेल खोटं बोलताहेत. म्हणून त्यांना जिवंत जाळण्यात यावं, झालं! मंडळी लटपटली. अन् काय सांगावं?—त्यांना पेटवून देताच रासायनिक शक्तीचे साठे चट्‌चट् बाहेर पडले की!

अतिप्राचीन कालापासून मानवाने या इंधनांची रासायनिक शक्ती पुरेशी उब निर्माण करण्यासाठी, अन्न शिजविण्यासाठी उपयोगात आणली. अजूनही त्याच्या आगगाड्या, जहाजे, मोटारी यांच्याच जोरावर जोसात पळताहेत. द्रव इंधनाच्या ज्वलनामुळे जी रासायनिक शक्ती मुक्त होते तीमुळे तर अग्निबाण अन् विमाने उंच अवकाशात झेपावताहेत.

अशी ही इंधने! ज्यांनी मानवाला बरंच काही मिळवून दिलं. निसर्गावर स्वामित्व मिळविण्याच्या कामी त्यास विपुल मदत देऊ केली. या इंधनाच्या प्रतापामुळे पृथ्वीसुद्धा हा हा म्हणता लहान झाली. संकुचित झाली. पण मानवाचे हे सारे पराक्रम केवळ पृथ्वीपुरते मर्यादित होते. हे लक्षात आलं अन् महत्वाकांक्षी माणसाला ते अपुरेपण चटकन सललं. त्यातून निर्माण झाली अवकाश जिंकण्याची ओढ—ही ओढ तशी पूर्वीपासूनच होती म्हणा!

'अडचणींच्या धुक्यातून ताऱ्याकडे जाणारी वाट जाते. पण आम्हाला कुठं जमणार आहे धुक्यातून वाट काढायला?' निळ्या आकाशाची ओढ लागलेले आपले पूर्वज गंमतीने म्हणायचे, आणि मग लगेच रंगीबेरंगी स्वप्न रंगविण्यात ते दंग होऊन जायचे. त्यांना वाटायचे, एक ना एक दिवस, आपल्या उंचीबद्दल भयंकर अहंकार बाळगणाऱ्या या निळ्या निळ्या अथांग अवकाशात आपण उंच झेपावू अन् हसत हसत त्याला म्हणू, 'असा बघतोस काय खुळ्यासारखा? अं? आम्ही आलोय बघ. चल चल हँट उतरव पाहू पटकन अन् आमच्या स्वागताला सिद्ध हो!'

नेमकी हीच घोषणा करीत विसावं शतक उगवलं. पुन्हा एकवार ह्याच ओढीनं मानवाला घेरलं. पण यावेळी सोबत फक्त स्वप्नं नव्हती. सत्य होतं. नुसताच कल्पनांचा खेळखंडोबा नव्हता. तर विज्ञानाचा भक्कम पाठिंबा होता. पृथ्वीचा निरोप घेऊन उंच अवकाशात झेपावण्यासाठी मानव अगदी अधीर झाला. त्या दृष्टीनं त्याचं पहिलं लक्ष होतं 'चंद्र.'

## चला घेऊ या पृथ्वीचा निरोप

इथं अर्थात नुसतं 'अच्छा टाऽटा पृथ्वी, बाय बाय!' म्हणून भागण्यासारखं नाही. कारण आपण नुसतं 'निघू' म्हणायचा अवकाश, लगेच अनेक बोके आडवं जाण्यासाठी सरसावून बसतात. पृथ्वीचा निरोप घेऊन चंद्रप्रवासास निघताना

सर्वात पहिल्यांदा आडव्या पळणाऱ्या पहिल्या बोकोबाचं नाव आहे 'पृथ्वीचं गुरूत्वाकर्षण.'

पृथ्वीय गुरूत्वाकर्षणातून सुटका करून घेण्यासाठी त्यावर मात करणे एवढाच एकमेव पर्याय शिल्लक आहे. अन् त्यासाठी अर्थातच काही शक्ती खर्ची टाकणं आवश्यक आहे. पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणावर मात करण्यासाठी जेवढं कार्य करणं आवश्यक आहे, नेमकी त्याला समतुल्य एवढी गतिजन्य शक्ती अग्निबाणानं पृथ्वीच्या वातावरणातून जात असतानाच प्राप्त करून घेणं जरूरी आहे. आता प्रश्न एवढाच की, यशस्वीपणे गुरूत्वाकर्षणावर मात करण्यासाठी केवढं कार्य करावयास हवं? उत्तर तसं सोपं आहे. अग्निबाणाच्या वजनाची वस्तू पृथ्वीय त्रिज्येएवढ्या अंतरातून वर उचलण्यासाठी जेवढं कार्य करायला लागेल, तेवढंच कार्य! आता पृथ्वीची त्रिज्या आहे ६,३७८ किलोमीटर्सएवढी. तेव्हा पृथ्वीय गुरूत्वाकर्षणातून सुटण्यासाठी यानाच्या चलनयंत्रांनी [motors], यानाच्या एकूण वजनाच्या प्रत्येक किलोग्रॅममागे ६३,७८,००० किलोग्रॅम मीटर्स एवढं कार्य करावयास हवे. सोविएत रशियाचं ल्युनिक–२ नावाचं यान सप्टेंबर, १९५९ मध्ये सोडण्यात आलं. त्याच्या अखेरच्या टप्प्याचं वजन १,५११ किलोग्रॅम्स होतं. अर्थातच पृथ्वीय गुरूत्वाकर्षणावर मात करण्यासाठी करण्यात आलेलं कार्य होतं तब्बल १०,००० किलोग्रॅम–मीटर्स एवढं!

## गुरूत्वाकर्षण

न्यूटनच्या गुरूत्वाकर्षणासंबंधीच्या सुप्रसिद्ध नियमानुसार आपल्याला ठाऊकच आहे की, प्रत्येक वस्तू ही दुसऱ्या वस्तूकडे गुरूत्वाकर्षण शक्तीने खेचली जात असते. ही शक्ती त्या वस्तूंच्या वस्तुमानांच्या गुणाकाराच्या समप्रमाणात व त्यांच्यामधील अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणात असते. ज्या शक्तीने इतर वस्तू पृथ्वीकडे आकर्षिल्या जात असतात त्या शक्तीला आपण आपल्या सोयीसाठी त्या वस्तूचे वजन म्हणतो.

गुरूत्वाकर्षणाच्या या नियमानुसार हे स्पष्टपणे दिसून येईल की एखाद्या विशिष्ट वस्तुमानाची वस्तू पृथ्वीच्या पृष्ठभागापासून वर उचलण्यास सुरुवात केली तर तिचे वजन क्रमाने घटत जाईल. एक पृथ्वीय–त्रिज्येएवढ्या अंतरावर असणारी वस्तू प्रत्यक्षात ती पृथ्वीय मध्यापासून दोन–पृथ्वीय–त्रिज्येएवढ्या अंतरावर असल्याने मूळच्या वजनाहून चार पटीने हलकी झाली असेल. ही उंची दुप्पट केली म्हणजे एखादी वस्तू पृथ्वीच्या पृष्ठभागापासून दोन पृथ्वीय–त्रिज्येएवढ्या अंतरातून वर उचलली तर तिचे वजन, तिच्या मूळच्या वजनाच्या फक्त १/९ एवढेच उरेल. (कारण यावेळी ती वस्तू पृथ्वीय मध्यापासून तीन–पृथ्वीय–त्रिज्येएवढ्या अंतरावर असेल.) या व्यस्त प्रमाणाचा, थोडक्यात फायदा एवढाच की, अग्निबाण जसा पृथ्वीपासून दूर जाण्यासाठी गती घेईल तसतसे त्याचे वजन झपाट्याने उतरत जाईल.

पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणाचा परिणामही या व्यस्त प्रमाणामुळे कमी होत जाईल. अर्थातच मग जेव्हा अग्निबाण चंद्राच्या अगदी निकट जाऊन पोहोचेल तेव्हा चंद्राच्या गुरूत्वाकर्षणाचा प्रभाव त्याच्यावर पडू लागेल आणि तो चंद्राच्या दिशेने खेचला जाईल. या काळात त्याचा प्रवेग वाढतच जाईल. अखेरीस अग्निबाण प्रती सेकंदास २·४ किलोमीटर्स एवढी गती प्राप्त करून घेईल. यान चंद्राकडून पुन्हा पृथ्वीकडे येण्यासाठी जरूरी असणारा हा 'मुक्तिवेग' आहे. 'मुक्तिवेग' म्हणजे आकाशस्थ ग्रह-उपग्रहांच्या गुरूत्वाकर्षणाचा पट्टा तोडण्यासाठी लागणारी गती होय. ती वेगवेगळ्या ग्रहांसाठी निरनिराळी आहे. मंगळासाठी ५ किलोमीटर्स प्रती सेकंद, शुक्रासाठी १०·३ किलोमीटर्स प्रती सेकंद, शनिसाठी ३६·७ किलोमीटर्स प्रती सेकंद असून ६०·८ किलोमीटर्स प्रती सेकंद एवढी ती गुरूसाठी आहे.

## लक्षणांक गती

चंद्रप्रवास करून परत येण्यासाठी यानानं प्रथम आपला प्रवेग वाढवून ११·२ किलोमीटर्स प्रती सेकंद एवढी गती प्राप्त करून घ्यावयास हवी. (वातावरणाच्या अडथळ्यावर मात करण्यासाठी जी अधिक गती आवश्यक आहे ती येथे लक्षात घेतलेली नाही.) चंद्राच्या पृष्ठभागावर उतरताना त्याची गती २·४ किलोमीटर्स प्रती सेकंदवरून शून्यापर्यंत उतरली पाहिजे. चंद्रावरून पुन्हा उड्डाण केल्यावर त्याची गती २·४ किलोमीटर्स प्रती सेकंदपर्यंत वाढून पृथ्वीवर उतरताना त्याचा गती पुनश्च ११·२ किलोमीटर्स प्रती सेकंदपासून शून्यापर्यंत उतरावयास हवी. या साऱ्या विविध गतींची बेरीज केली असता जी किंमत मिळते तिला 'characteristic velocity' किंवा 'लक्षणांक गती' असे म्हणतात. या लक्षणांक गतींच्या आधारे एका चंद्रप्रवासासाठी किती शक्ती लागेल ह्याचा हिशब करणे सहजशक्य होते. आणि त्यावरून सुरुवातीस यानात इंधनाचा साठा किती असावा तेही काढता येते. एका चंद्रफेरीसाठी लक्षणांक गती आहे २७·२ किलोमीटर्स प्रती सेकंद.

तथापि, इथं हे जरूर लक्षात ठेवलं पाहिजे की, प्रत्यक्षात नुसत्या गतींच्या बेरजेने काम भागत नाही. इतके सोपे हिशेब नसतात ते! यानानं जर ११ किलोमीटर्स प्रती सेकंद एवढी गती प्राप्त करून घेतली की ते सरळ दोन लाख किलोमीटर्सचा प्रवास करून जाईल. हे अंतर, चंद्राच्या अंतराच्या निम्म्याहून थोडं अधिकच आहे. म्हणजे अग्नियानाने आपला निम्मा प्रवास पुरा केला आहे. पण अजूनही यानाची गतिजन्य शक्ती पृथ्वीय गुरूत्वाकर्षणावर मात करू शकलेली नाही. साहजिकच यान पुन्हा लंबवर्तुळाकार कक्षेत खेचलं जाईल. यानंतर गतीत होणारी किंचितशी वाढसुद्धा यानाच्या मार्गात लक्षणीय बदल घडवून आणेल. यानानं ११·१ किलोमीटर्स प्रती सेकंद एवढी गती मिळविली की त्याचा मार्ग त्याला पृथ्वीपासून ४,००,००० किलोमीटर्स दूर घेऊन जाईल. यावेळी यानाचा मार्ग चंद्राच्या कक्षेला छेदून जाईल. वेगळ्या शब्दात सांगायचं म्हणजे, चंद्रावर पोचण्या-

साठी आवश्यक असणारी किमान गती आहे (फक्त !) ११·१ किलोमीटर्स प्रती सेकंद एवढीच ! पृथ्वीसाठी असणाऱ्या मुक्ति-वेगाहून ती थोडीशीच कमी आहे; पण यानाच्या कक्षेचा अपभू (apogee) चंद्राच्या कक्षेपर्यंत नेऊन पोचवण्यास ती पुरेशी आहे. अग्नियान तिथे पोचायच्यावेळी चंद्र आपल्या कक्षेच्या नेमक्या विरुद्ध बाजूला असेल तर यान त्या उंचीवरून पृथ्वीभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत प्रदक्षिणा घालीत राहील – एक तर चंद्र भेटेपर्यंत किंवा पृथ्वीय गुरूत्वाकर्षणाच्या-मुळे गती कमी होत जाऊन अखेरीस ते पृथ्वीवर पडेपर्यंत !

यानंतर यानाची गती जर आणखी फक्त ०·१ किलोमीटर्स प्रती सेकंदने वाढविली म्हणजे ती ११·२ किलोमीटर्स प्रती सेकंद केली तर यान तडकाफडकी आपली लंबवर्तुळाकार कक्षा तोडून टाकेल, आणि सरळ परिवलयाकार (parabolic) मार्ग स्वीकारून ते पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणातून कायमचे निसटून जाईल.

## थोडासा बदलही...

आतापर्यंत चाललेली सारी चर्चा ही एका महत्त्वाच्या गृहीतावर आधारलेली आहे. 'आवश्यक असणारी गती याने तत्क्षणी प्राप्त करून घेते' हे ते गृहीत होय. ही गोष्ट प्रत्यक्षात कधीच शक्य होत नाही. कारण आवश्यक ती गती गाठायला यानाला नेहमीच काही काळ लागतो. आणि वेग वाढत असतानाच ते शेकडो किंवा हजारो किलोमीटर्सचा प्रवास करून जाते. आता जितके ते या काळात उंच उंच जाते, त्या मानानं पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणावर मात करण्यासाठी आवश्यक असणारी अंतिम गती अशी कमी कमी होत जाते. २०० किलोमीटर्स उंचीवर ११·० किलोमीटर्स प्रती सेकंद; १००० किलोमीटर्स उंचीवर १०·४ किलोमीटर्स प्रती सेकंद; अन् ६,००० किलोमीटर्स उंचीवर ८ किलोमीटर्स प्रती सेकंद जर यानानं या मधल्या काळात चंद्राच्या अंतराच्या एक दशांशाएवढे म्हणजे सुमारे ४०,००० किलोमीटर्स अंतर तोडले असेल तर प्रवास सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असणारा वेग आहे फक्त ४·२ किलोमीटर्स प्रती सेकंद.

यानाचा मार्ग वारंवार दुरूस्त करून घेणाऱ्या यंत्रणेच्या अभावी चंद्रावर उतरणे वाटते तितके सोपे नाही. प्रक्षेपपथ काटेकोरपणे आखून त्या पथावर यान सतत रहाते आहे की नाही यावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कारण थोडीशी चूकही सारी चंद्रप्रवासाची मोहीम फसवून टाकायला पुरेशी ठरेल. नियोजित गतीत जर फक्त १ मीटर प्रती सेकंद एवढीच म्हणजेच अंतिम गतीच्या ०·०१ टक्के एवढीच चूक झाली तर चंद्रावर उतरण्यासाठी नियोजित करण्यात आलेल्या जागेपासून यान २५० किलोमीटर्स दूर जाऊन पडेल. ठरविण्यात आलेल्या दिशेऐवजी गती-चलनाभिज्येत (velocity-vector) एक मिनीटाचा फरक पडला तरी यान ठरविलेल्या बिंदूपासून २०० किलोमीटर्स दूर उतरेल. यानाच्या उतरण्याच्या नियोजित क्षेत्रात बदल घडवून आणणाऱ्या काही गोष्टींपैकी महत्त्वाची

गोष्ट म्हणजे, अवकाशातील ज्या बिंदूवर यानाची चलनयंत्रे बंद वा कार्यान्वित करण्यात येतात त्या बिंदूंचे कोऑर्डिनेटस् ही होय. उतरत्या क्रमांनी आकडे मोजत असताना होणारी दहा सेकंदाची चूक यानाला नियोजित क्षेत्रापासून २०० किलोमीटर्स दूर घेऊन जाईल. ही अंतरे काही फारशी प्रचंड नाहीत; पण आपल्याला ठाऊक आहे की, चंद्राची त्रिज्या आहे फक्त १,७४० किलोमीटर्स एवढीच. त्यामुळेच यानाच्या मार्गात बदल घडवून आणणाऱ्या या नानाविध गोष्टी लक्षात घेता चंद्रावरच उतरायचे असेल तर यानावर प्रथमपासूनच काही बंधने घालून, ती त्यास काटेकोरपणे पाळायला लावणे अपरिहार्यच आहे. कोणती ती बंधने ? ही पहा :

१. नियोजित गतीत फक्त काही मीटर्स प्रती सेकंद याहून अधिक फरक पडता कामा नये.

२. गती-चलनाभिज्येतही एक दशांश अंशाहून अधिक चूक राहू नये.

या अटी पूर्ण करणे हे काही 'येरा गबाळाचे काम नोहे'

चंद्राचं एक सोडा, पण उद्याला इतर ग्रहांकडे झेपावणाऱ्या अवकाशयांत्रिकांना आपल्याबरोबर नक्कीच चिक्कार सामान न्यावं लागेल. या 'उपयुक्त व आवश्यक सामाना'ला – ज्यामध्ये नानाविध यंत्रे, ट्रान्समीटर, टेलिव्हिजन कॅमेरे, वगैरे आणि अंतरीक्षयात्री व त्यांचे अंतरीक्ष-यान (space capsule) यांचा समावेश होतो, त्याला 'पे लोड' म्हणतात.

अग्निबाण तंत्रातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे 'वस्तुमान-गुणोत्तर' होय. अग्निबाणाचं उड्डाणाच्या वेळचं एकूण वस्तुमान (पे लोडचं वजन + इंधनसाठ्याचं वस्तुमान) व पे लोड यांच्या गुणोत्तरालाच 'वस्तुमान-गुणोत्तर' म्हणतात. इंधन वगळता अग्निबाणाचं उरलेलं वस्तुमान म्हणजे त्याच्या पे लोडचेच वस्तुमान होय. म्हणूनच जरा वेगळ्या शब्दात व्याख्या करताना, संपूर्ण अग्निबाणाचं वस्तुमान व सर्व इंधन जळून गेल्यानंतरचे अग्निबाणाचे वस्तुमान यांच्या गुणोत्तराला 'वस्तुमान-गुणोत्तर' म्हणतात. अर्थात अर्थ तोच, शब्द वेगळे एवढंच !

आतापर्यंतच्या अनेक अंतरीक्षमोहीमांचा अभ्यास करता प्रकर्षाने लक्षात येणारी गोष्ट म्हणजे, 'पे लोडच्या प्रत्येक टन वजनामागे अग्निबाण-तळावर उभ्या असलेल्या अग्निबाणाचं वजन तब्बल दोनशे टन असावं लागते', ही होय. उदाहरणच घ्यायचे झाले तर एका सुप्रसिद्ध अवकाशमोहीमेचे घेता येईल. अमेरिकेचा 'अंतरीक्ष-जादूगार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या बर्नर व्हॉन ब्रॉन प्रणित या अंतरीक्ष मोहिमेत केवळ तीस टन वजनाचं पे लोड ६,४०० टन वजनाच्या अग्निबाणाच्या बऱ्याच खालच्या (कमी उंचीच्या) कक्षेत सोडण्यात आले होते. 'आणखी एका अशाच मोहिमेत, ५,००० टनांच्या अग्निबाणाच्या सहाय्याने केवळ पंचवीस टनी पे-लोड वर्तुळाकार कक्षेत फेकण्यात आलं होतं. २०० : १ हे वस्तुमान-गुणोत्तर

फक्त अवजड उपग्रह वाहून नेणाऱ्या अग्निबाणाच्या संदर्भातच वापरता यण्या-सारखं आहे. कारण लहान उपग्रहांच्या बाबतीत हे गुणोत्तर भलतेच प्रचंड बनते. उदाहरणार्थ, केवळ वीस पौंड वजनाचा उपग्रह अंतराळात घेऊन जाणाऱ्या अमेरिकेच्या व्हॅनगार्ड योजनेतील अग्निबाणाचं वजन दहा टन असे – म्हणजे पे लोडच्या एक हजार पटीहूनही अधिक !

चंद्रमोहीमेसाठी खर्च करावी लागणाऱ्या शक्तीची बाब लक्षात घेता २०० : १ हे वस्तुमान गुणोत्तर गृहीत धरावयास हरकत नाही. अग्निबाणाच्या चलनयंत्रांद्वारे निर्मिलेला अधोदाब (Thrust) अग्निबाण-उड्डाणाच्यावेळी त्याच्या एकूण वजनाच्या दुप्पट असणे जरुरीचे असते. म्हणजे, एक टन वजनाचे पे लोड अंतरिक्षात फेकण्यासाठी अग्निबाणाच्या चलनयंत्रांनी ४०० टनांचा अधोदाब निर्माण करावयास हवा.

अग्निबाणाच्या चलनयंत्रांची विशेषता जोखली जाते ती निर्माण करू शकत असलेल्या अधोदाबावरूनच. अग्निबाण परिचालना (propulsion) च्या सिद्धांतानुसार अग्निबाण-चलनयंत्रांचा अधोदाब हा उड्डाणगतीपासून स्वतंत्र असतो. अग्निबाणाची परिचालन यंत्रणा ज्या दराने उपयुक्त कार्य करते त्याला 'Thrust power' किंवा 'अधोदाब-शक्ती' म्हणतात. ही अधोदाब-शक्ती मात्र अग्निबाणाच्या उड्डाणगतीला प्रमाणबद्ध (proportional) असते.

## शक्ती निर्माण कशी होते ?

वर उल्लेखिलेल्या मोहीमांमध्ये पहिल्या टप्प्याची यंत्रे यानाचा वेग दोन ते तीन किलोमीटर प्रती सेकंदपर्यंत वाढवण्यासाठी उपयोगात आणली गेली. त्यातली किमान किमत, दोन किलोमीटर्स प्रती सेकंद, गृहीत धरून हिशेब करता असे दिसून आले की, ४०० टनांचा अधोदाब निर्माण करणारे यंत्र १० दशलक्ष अश्वशक्ती एवढी शक्ती खर्ची टाकत होते. तेव्हा, १० टन वजनाचे पे लोड अंतरिक्षात फेकण्यासाठी यंत्रांनी १०० दशलक्ष अश्वशक्ती एवढी शक्ती निर्माण करावयास हवी. ही फारच प्रचंड शक्ती आहे. अन् सुमारे तीस किंवा अधिकच, जलविद्युतकेंद्रेनिर्मित एकूण शक्तीहून ती जास्तच आहे. स्वाभाविकपणेच, एक प्रश्न पुढे येतो की, मग अग्निबाण कशाप्रकारे ही शक्ती निर्माण करू शकतो ?

शक्ती निर्माण केली जाते इंधनाद्वारे–जी घन, द्रव किंवा वायुरूपही असू शकतील. इंधनाचा विचार करताना, त्यांची गुणवत्ता ठरविणारा पहिला परीक्षक म्हणजे त्यांचा 'उष्णतांक' होय. यालाच इंग्रजीत 'हीट व्हॅल्यू' म्हणण्यात येते. एकेक वजनाच्या इंधनाच्या संपूर्ण ज्वलनातून उत्पन्न होणारी उष्णता म्हणजे त्या इंधनाचा 'उष्णतांक' होय. ज्या इंधनाचा हा उष्णतांक प्रचंड असेल ती इंधने अंतरिक्षप्रवासासाठी सुयोग्य व उपयुक्त म्हणून निवडली जातात. ज्वलनकोठीमध्ये इंधनाच्या ज्वलनातून उष्णता जितक्या अधिक प्रमाणात निर्माण होईल तितक्याच प्रमाणात पुच्छछिद्रा (nozzle) मधून बाहेर पडणाऱ्या वायुच्या स्रोताची गतिजन्य-

शक्ती जास्त असेल. या वायुच्या झोताच्या गतीलाच ' exhaust velocity ' किंवा ' निर्गमन गती ' म्हणतात. ही निर्गमन गती जितकी जास्त असेल तितकाच अधोदाबही वाढेल.

ग्रहप्रवास यशस्वीरीत्या पूर्ण करून येण्यासाठी अग्निबाणाजवळ इंधनाचा साठा किती असावा याचे अचूक दिग्दर्शन रशियन शास्त्रज्ञ त्सिल्कोव्हस्की यांच्या सुप्रसिद्ध सूत्रावरून होऊ शकते. बऱ्याच वर्षांपूर्वी म्हणजे इसवी सन १८९० मध्ये जन्मलेल्या या गणिती सूत्राने अंतर्ग्रही [ inter planetary ] अग्निबाण प्रवासाचा विलक्षण गुंतागुंतीचा असणारा भौतिकी प्रश्न गणिताच्या साध्या, सोप्या भाषेत बदलून टाकला आहे; अन् त्याचबरोबर अग्निबाणाची गती ही ज्वलन पावलेल्या इंधनाचे प्रमाण आणि निर्गमन गतीवर कशा रीतीने अवलंबून आहे हेही सुस्पष्टपणे दाखवून दिले आहे. ते सूत्र काहीसे असे आहे :

$$V = V_j \log \left[ 1 + \frac{M_f}{M_r} \right]$$

या सूत्रातील V म्हणजे अग्निबाणाची गती आणि $V_j$ म्हणजे निर्गमन गती होय. $M_f$ म्हणजे इंधनाचे वस्तुमान असून $M_r$ आहे उरलेल्या यानाचे वस्तुमान अर्थात पे लोड.

सूत्रावरून दिसून येणारी पहिली गोष्ट म्हणजे अग्निबाणाची गती अधिकात अधिक असावयास हवी. अशी असेल तर त्या प्रमाणात निर्गमन गती आणि इंधन व पे लोड यांच्या वस्तुमानाच्या गुणोत्तराची किमतही प्रचंड असायला हवी.

दुसरा महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे, अग्निबाणाची उड्डाणगती ही इंधनाचे वस्तुमान व पे लोड यांच्यावर बरोबरीने अवलंबून असते; केवळ इंधनाच्या प्रमाणावर नाही. तेव्हा, तात्त्विकदृष्टया कुठल्याही आकाराचा अन् कुठलीही गती पकडू शकणारा अग्निबाण बनविता येणे शक्य आहे.

समजा, की $M_f / M_r$ या गुणोत्तराची किंमत आहे ३; म्हणजे इंधनाचे वजन पे लोडच्या तिप्पट आहे. अशा प्रकारचा अग्निबाण अस्तित्वात असणे सहज शक्य आहे. सध्या ज्ञात असलेल्या इंधनाचा वापर केला गेला, तर सूत्रावरून असे दिसून येते की, यानाची कमाल अंतिम गती फक्त ७,८८० मीटर्स प्रती सेकंद एवढीच असेल. ही गती तर यानाला कक्षेत फिरत ठेवण्यासही पुरेशी नाही. हे गुणोत्तर ६ पर्यंत वाढवले, म्हणजे अग्नियानाच्या एकूण वजनाच्या (पे लोड व इंधन यांचे एकत्रित वजनाच्या) ८६% वजनाचे इंधन घेतलं तर मात्र कमाल अंतिम गती ११,१०० मीटर्स प्रती सेकंद एवढी मिळू शकेल. पे लोड व इंधन यांच्या गुणोत्तराऐवजी निर्गमन गतीच्या भाषेत विचार केला तर कोणते निष्कर्ष निघतील ? हे पहा ना : निर्गमन गती २४०० मीटर्स प्रती सेकंद असल्याचं गृहीत धरलं तर

११,१०० मीटर प्रती सेकंद ही अंतिम गाठण्यासाठी यानातील इंधनाचा साठा पे लोड व उरलेला अग्निबाण यांच्या एकूण वजनाच्या १०५ पट वजनाचा असावयास हवा. पण १०५ : १ हे गुणोत्तर प्रत्यक्षात उतरवील असे; परिचालन यंत्रे, मार्गदर्शक यंत्रे, पे लोड आणि इंधनटाक्या यांनी सजलेलं यान तयार करणं अशक्यच आहे. चंद्रावर पोचून परत येणाऱ्या अग्निबाणासाठी अशा प्रकारची अवजड रचना उपयुक्त ठरणारी नाही. विशेषतः, अशा यानाला वातावरणाच्या विरोधावर मात करण्यासाठी जी शक्ती खर्च करावी ती लक्षात घेतली तर–वर सुचविलेली निर्गमन गती गाठणाऱ्या अग्निबाणात त्याच्या पे लोडच्या एकूण वजनाच्या १०,००० पट अधिक इंधन त्याला वापरावे लागेल.

या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी दोन मार्ग खुले आहेत. एक म्हणजे अत्युच्च उष्णतांक असणाऱ्या इंधनाचा शोध लावणे अन् दुसरा म्हणजे परिचालन यंत्रणेची कार्यक्षमता शक्य तितकी जास्त वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे. पैकी आपल्याला विचार करायचा आहे तो पहिल्या मार्गाचा ! किंचितसा इतिहास अन् थोडासा वर्तमान पाहून मग भविष्यात दूरवर नजर फेकायची आहे–काय दिसतंय ते पहाण्यासाठीच अर्थात ! [ लेखांक दोन पुढील अंकी ]

◻ ◻ ◻

---

## भगव्या ध्वजावर कोयता-हातोडा...

पृष्ठ ८ वरून

देशभक्तच आहेत. पण जनतेच्या उठावापुढे त्यांचे तीनतेरा का वाजले याचा विचार करणे आवश्यक आहे. भारतात त्याच इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. (म्हणून कदाचित् कम्युनिस्टांनाही जनसंघ सत्तेवर लवकर यावा असे मनातून वाटत असेल.)

वरील सर्व विवेचनाचे सार आपल्या देशात हिंदुत्वनिष्ठ, तरीही समतानिष्ठ असा पक्ष निर्माण व्हावा हे आहे. हिंदुत्वनिष्ठ समाजवाद हा वदतोव्याघातासारखा प्रकार नव्हे. युरोपात ख्रिश्चन सोशॅलिस्ट पार्टी असू शकते. इस्रायलमधील 'मापई' हा पक्षही अशाप्रकारे ज्यूवादी व समाजवादी आहे. भारतातही असा हिंदू–समाजवादी पक्ष हवा. हिंदूतील खालच्या वर्गाचा उद्धार–त्यांना आपल्या धर्मात समानतेची वागणूक, अर्थकारणातही समानता प्राप्त करून देणारा पक्ष येथे निर्माण व्हावा. या देशातील ८० टक्के प्रजा हिंदू आहे व त्यातील ८० टक्के प्रजा सामाजिक व आर्थिक दृष्टीने दलित आहे असे मानून तिच्या दास्यमुक्तीसाठी झटणारा पक्ष हवा. बहुजनसमाजाचे हित हेच हिंदुधर्माचे हित व राष्ट्राचे हित असे समजणारा पक्ष हवा. भगव्या ध्वजावर कोयता हतोडा मिरवणारा पक्ष हवा. असा पक्षच देशातील राजकारणाची अवरूद्ध कोंडी फोडू शकेल.

◻ ◻ ◻

# रंगभूमि

शरद गोखले

**म**राठी रंगभूमीनंतर आपला थोडाफार संपर्क येतो तो बंगाली आणि गुजराथी रंगभूमीशी. त्यामानाने दक्षिणेकडील रंगभूमीविषयी आपल्याला फार थोडी माहिती आहे. कठीण भाषा, संपर्काचा अभाव, आणि दाक्षिणात्यांसंबंधीच्या गैर-समजुती यामुळे दक्षिणेकडील मंडळींच्या सांस्कृतिक जीवनापासून आपण अलग पडलो आहोत. एखादी तामीळ, अथवा मल्याळम नाटचकृती पाहण्याची खूप दिवसाची इच्छा होती. एन्. एन्. पिले यांनी गेल्याच आठवडचात पुण्यात सादर केलेल्या 'कापालिका' या मल्याळम नाटकाच्या निमित्ताने तसा योग आला.

कापालिका, ही मध्यमवयीन स्त्री या नाटकाची नायिका. मुंबईमध्ये अत्यंत संपन्न वस्तीमध्ये, कापालिका वेश्याव्यवसाय करत असते. थोरामोठचांचा आश्रय लाभत असल्याने कापालिकाची आर्थिक स्थिती चांगली असते. एक ख्रिश्चन पाद्री कापालिकेकडे अनाथालयासाठी मदत मागण्यास येतो. कापालिकेच्या व्यवसाया-संबंधी त्याला कल्पना नसते. परंतु कापालिका आपल्या व्यवसायाचे स्वरूप त्याला सांगते. आणि त्याला धक्का बसतो. पाद्री जाण्यापूर्वी बेल वाजते. पाद्रयाला आत बसायला सांगून कापालिका दार उघडते. ए. एस्. नायर दारात उभा असतो. नेहमीचे गिऱ्हाईक असल्याने कापालिका त्याचे स्वागत करते. आपल्या घरी वावरावे इतक्या सहजतेने नायरसाहेब वावरत असतात. मनमोकळेपणे बातचीत करीत असतात. ते स्वच्छ शब्दात कापालिकेला सांगतात, -- यापुढे मी येणार नाही. केरळ-मध्ये माझ्या गावी जाऊन विवाह करणार आणि नवीन जीवन सुरू करणार. कापालिकेची बरीच रक्कम या गृहस्थांनी द्यावयाची असते. त्याच्याशी भांडून, आणि धाकदपटशा दाखवून कापालिका रक्कम वसूल करते. इतक्यात एक स्वामीजी प्रवेश करतात. विमानाखेरीज प्रवास नाही, उत्कृष्ट अन्नाखेरीज भोजन नाही, आणि संपन्नतेशिवाय जीवन नाही. असे आयुष्य जगून देशातील दरिद्री जनतेची सेवा करायला निघालेल्या या स्वामीजींचा शिष्यगण या देशाखेरीज अन्यत्र पसरला आहे. अशा या थोर विभूतीचे दर्शन घडताच कापालिका चपापते. कारण स्वामीजी दुसरा तिसरा कुणी नसून तिच्या पूर्वायुष्यातील प्रियकर असतो. धर्माने ख्रिश्चन असलेला हा प्राणी थोर हिंदू साधू म्हणून मिरवत असतो. फार वर्षापूर्वी केरळ-

# कापालिका

मधील त्याच्या गावी त्याने कापालिकेला विवाहाचे वचन दिलेले असते. आणि दिलेले वचन पूर्ण करण्याऐवजी तिच्यावर अत्याचार करून, तिचा हा प्रियकर अलेक्झांडर नाहीसा झालेला असतो. आपल्या आजच्या अवस्थेला हाच जबाबदार आहे याची खात्री असल्याने कापालिका त्याची योग्य संभावना करते.

**करूण शेवट**

नाटकाचे पुढील कथानक, केरळमधील एका छोटचा खेड्यात घडते. एका छोटचा ख्रिश्चन कुटुंबातील निळीकुपी या तरुणीचे लग्न ठरलेले असते. विवाह निश्चिती आज होणार असते. वरपक्षाला वरदक्षिणा म्हणून पंधरा हजार रुपयाची रक्कम द्यावयाची असते. वरपक्षाची मंडळी हजर असतात. आणि ही रक्कम घेऊन येणाऱ्या मुलीच्या मोठ्या बहिणीची सर्वजण मार्गप्रतिक्षा करत असतात. आपल्या भावी वधूशी नवरदेव मोठ्या खुषीत गप्पा मारत असतात. गप्पा मारत असताना आपल्याजवळील काही फोटो निळीकुपी मोठ्या कौतुकाने दाखवते. त्यातील एका फोटोवर बोट ठेऊन ती मोठ्या अभिमानाने म्हणते ही माझी मोठी बहीण रोशमा. फोटो पाहून नवरदेव हबकून जातात. कारण ही रोशमा म्हणजेच कापालिका, आणि हे नवरदेव म्हणजे – मुंबईतील उद्योगपती ए. एस्. नायर. परिस्थिती स्पष्ट झाल्यावर आपल्याला लग्न करायचे नाही अशी घोषणा नवरदेव करतात. नव्ऱ्या मुलाचे वडील प्रतिष्ठीत राजकीय पुढारी. आणि एम्. एल्. ए. आयत्यावेळी माघार घेतली तर हाती येणारी रक्कम जाईल. अशी धास्ती म्हणून ते आपल्या मुलाला उपदेश करतात की, रक्कम हातात येऊ दे. मग पाहिजे तर लग्न कर अथवा करू नको. लग्न मोडणार या चिंतेने लग्न ठरवणारा मध्यस्थी अस्वस्थ झाला आहे. आपले कमिशन कसे पदरात पडेल याची त्याला चिंता आहे. तर आपले भवितव्य काय ? या चिंतेने नवरीमुलगी अस्वस्थ आहे. अशा परिस्थितीत कापालिका येते. आपला भावी मेव्हणा पाहून तिला धक्का बसतो. तरी त्याहून मोठा धक्का म्हणजे या मुलाचे वडील – म्हणजे सध्याचे राजकीय पुढारी – आणि विधान सभेचे माननीय सदस्य, हेही तिचे एका काळचे कस्टमर असतात. मुंबईत चित्रपटांसाठी 'एक्स्ट्रॉ सप्लायर'चे काम करणारा हा प्राणी बक्कळ पैसा जमवून गांधी-

अस्पृश्यता एक राष्ट्रीय कलंक आहे. दलित वर्गाला समान संधी आणि समान अधिकार मिळवून देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने प्रामाणिक प्रयत्न करावा हीच आमची

॥ प्रार्थना ॥

वसंत जोगळेकर निर्मित आणि दिग्दर्शित मानवतावादी हिंदी चित्रपट लवकरच मुंबईत प्रदर्शित होत आहे.

वादी होऊन जनतेची सेवा करण्यासाठी राजकारणात उतरलेला असतो. बहिणीचे नुकसान होऊ नये म्हणून कापालिका या मंडळींना पैसे न देता त्यांच्याकडून पोच घेते. तथापि आपल्या भावी पतीचे, आणि सासऱ्याचे पूर्वचरित्र समजल्यावर निळीकुपी लग्नास नकार देते. तर आपली मुलगी मुंबईत काय व्यवसाय करत होती हे समजल्यावर कापालिकेच्या वृद्ध वडिलांचे मन व्याकूळ होते.

कापालिका गर्भाशयाच्या कॅन्सरने आजारी असते. त्यात हा मानसिक ताण असह्य होऊन ती हतबल होते. आणि मुलीच्या या अवस्थेला काही प्रमाणात आपणही जबाबदार आहोत या जाणिवेने तिचे पालक शरमिंदे होतात.

विश्व केरळ कला समिती या आपल्या संस्थेमार्फत श्री. एन्. एन्. पिळे यांनी सादर केलेले हे नाटक नेपथ्य, आणि तंत्र या दृष्टीने यथातथाच होते. कलाकारांचे अभिनय कौशल्यही फारसे प्रभावी वाटले नाही. कथासूत्र आधी समजावून घेतले असल्याने भाषेची फारशी अडचण जाणवली नाही.

प्रयोग संपल्यावर मुद्दाम श्री. पिळे यांना भेटलो. पिळे यांच्या संस्थेचे वैशिष्टच असे की बहुतेक सर्व कलाकार त्यांच्या कुटुंबियापैकी आहेत. त्यांच्या मोठचा मुलीने कापालिकेची, धाकटचा मुलीने तिच्या बहिणीची भूमिका केली आहे. ते स्वतः कापालिकेच्या वडिलांची भूमिका करतात. त्याखेरीज त्यांची बहीण, जावई या अन्य आप्त मंडळींनीही या नाटकात काम केले आहे. त्यांची संस्था फक्त त्यांनी लिहिलेली नाटके सादर करते. दिग्दर्शन ते स्वतः करतात. आपल्या आयुष्यातील अनेक वर्षे ते सिंगापूरमध्ये होते. १९६६ पासून त्यांनी आपली ही संस्था सुरू केली. प्रेद लोगम (भुतांचे राज्य) ईश्वरन सरकटली (तुरुंगामध्ये परमेश्वर) ही त्यांच्या संस्थेची नाटके गाजली असून त्यांचे चारशेवर प्रयोग झाले आहेत. कापालिका हे त्यांचे सध्याचे नाटकही अतिशय लोकप्रिय आहे.

'कापालिका' लेखनाचे दृष्टिने काहीसे भडक, आणि कथानक योगायोगांमुळे घडणाऱ्या घटनातून पुढे जाते, असे मी त्यांना म्हणालो असता, ते म्हणाले केरळीय मुलींचे जीवन, समाजातील भोंदूपणा, राजकीय कार्यकर्यांची नीतिमत्ता, या सर्व गोष्टींची परिणामकारक सांगड घालण्यासाठी अशा पद्धतीचे नाटक लिहावे लागले.

## केरळीय रंगभूमी

श्री. पिळे यांना केरळीय रंगभूमीसंबंधी मी अनेक प्रश्न विचारले, त्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी जी माहिती सांगितली ती मनोरंजक आहे. ते म्हणाले नाटक हा व्यवसाय म्हणून करणाऱ्या आणि नाव घेण्यासारख्या पाच सहा मोठचा कंपन्या आहेत. तथापी त्यातील बहुतेक कंपन्या कुठल्या ना कुठल्या राजकीय विचार सरणीचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष पुरस्कार करत असतात. त्या मानाने माझी कंपनी मी राजकारणापासून पुष्कळ अलिप्त ठेवली आहे. केरळ पिपल आर्टस क्लब या संस्थेच्या एका नाटकाचे नावच 'तुम्ही मला कम्युनिस्ट केलेत' असे आहे. केरळातील वास्तव

जीवनाशी जवळीक सांगणारे हे नाटक चांगलेच लोकप्रिय झाले. कायद्याची बंधने झुगारून सामाजिक न्याय द्या, अशी हाक देणारे प्रचारकी थाटाचे क्रॉस बेल्ट हे नाटकही लोकप्रिय ठरले. या नाटकावर आधारीत चित्रपट तयार झाला आहे. पण प्रदर्शनास सेन्सॉर परवानगी देत नाही. अशी माहितीही त्यानी सांगितली.

## व्यवसायाचे स्वरूप

सर्वसाधारणपणे केरळीय जनता सुशिक्षित, पण दरिद्री, जीवन संघर्ष अतिशय प्रखर, स्वस्थता त्या मानाने कमी, स्वाभाविकपणे नाटकाचा आश्रयदाता वर्ग त्या मानाने कमी. त्यातही सामाजिक प्रश्नावरील गंभीर प्रवृत्तीची नाटके, अथवा राजकीय प्रचार असलेली नाटके लोकांना आवडतात. केवळ भावनांशी खेळ खेळणारी, कौटुंबिक नाटके, पौराणिक नाटके अथवा कपोल कल्पित रंजक नाटके, आमचा प्रेक्षक पाहणार नाही. नाट्य व्यवसायातील अस्थिरतेमुळे फार थोडे कलावंत या व्यवसायात आहेत. आपल्याकडे असलेली 'नाईट पद्धत' फारशी प्रचारात नाही. कंपनी मासिक करारावर कलाकारांना बांधून घेते. प्रयोग होवोत न होवोत किमान ठरलेला मोबदला दिला जातो. त्रिवेंद्रमसारख्या मोठ्या शहरातील टागोर नाट्यगृहासारखा एखादा अपवाद वगळला, तर बांधलेली नाट्यगृहे कमी. सबंध केरळमध्ये मिळून कायम स्वरूपाची नाट्यगृहे जेमतेम ५–६ असतील. सर्वसाधारणपणे खुल्या नाट्यगृहात अथवा टाऊन हॉलमध्ये प्रयोग केले जातात.

नेपथ्य आणि तांत्रिक बाबतीत आमची तुलना मराठी अथवा बंगाली रंगभूमीशी करता येणार नाही. असे सांगून श्री. पिळे म्हणाले, नाट्य विषयाचे स्वरूप आणि आर्थिक मर्यादा यामुळे आम्हाला एका विशिष्ट मर्यादेपलीकडे जाता येत नाही. शिवाय आमचे दौऱ्याचे प्रमाण फारच मोठे असल्याने बोजड नेपथ्य मानवणार नाही. मात्र या परिस्थितीतही नेपथ्य आणि निर्मितीतील भव्यता यावर भर देऊन नाटके सादर करणारी कला निळयम ही संस्था आहे. नूरजहाँ, लाइफ ऑफ जिझस ख्राइस्ट या त्यांच्या नाटकातून त्यांनी भव्य निर्मितीचा आनंद प्रेक्षकांना दिला आहे. भव्य निर्मितीसाठीच ही संस्था आहे.

## हौशी रंगभूमी

हौशी रंगभूमीबंबंधी ते म्हणाले, हौशी रंगभूमिचे स्वरूप फारच मर्यादशील आहे. सबंध केरळमध्ये ज्यांना खऱ्या अर्थाने प्रयोगशील म्हणता येईल, अशा जेमतेम ३–४ संस्था आहेत. हौशी रंगभूमीवरील विक्रमन नायर, या व्यवसायाने इंजिनीअर असलेल्या कलावंताने चांगले नाव मिळवले होते. त्याच्या अकल्पित मृत्यूने हौशी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्याच्या स्मरणार्थ दरवर्षी स्पर्धा भरवल्या जातात.

नाटकाकडे पाहण्याचा केरळ सरकारचा दृष्टिकोन तटस्थतेचा आहे. 'तुमचे तुम्ही काहीही करा, नाहीतर मरा,' अशा दृष्टीने शासन आमच्याकडे पाहते. मात्र नाट्य लेखनावर कोणतेही 'सेन्सॉर' नाही. त्याचा आम्हाला लाभ होतो. असे सेन्सॉर

असते तर कापालिका रंगभूमीवर आलेच नसते. हौशी रंगभूमीसाठीही शासन काही करत नाही.

सध्या परिस्थिती प्रतिकूल असली, तरी केरळीय जनता कलाप्रेमी असल्याने आम्ही जिवंत आहोत असे सांगून पिळे म्हणाले, केरळची आर्थिक व राजकीय परिस्थिती सुधारून जनतेला स्वस्थता लाभल्यास नाटयक्षेत्र झपाट्याने वृद्धींगत होईल. आपल्या विधानाचा पाठपुरावा करताना ते म्हणाले, जेव्हा आम्ही केरळ-बाहेर दौरा करतो तेव्हा आम्हाला याची प्रचिती येते. मुंबई, दिल्ली, पुणे आदि ठिकाणी आमच्या नाटकासाठी २५ ते ५ रुपयांपर्यंत तिकीटे असतात आणि इतके भारी दर असूनही आमच्या प्रयोगांना 'हाऊस फुल्ल' गर्दी असते. केरळबाहेर असलेल्या आमच्या मंडळींना असलेली सुरक्षितता आणि स्वास्थ्य केरळमधील मल्याळी जनतेला मिळेल, तेव्हा प्रेक्षकांच्या रसिकतेचे हेच चित्र केरळमध्ये अढळेल.

◻ ◻ ◻

---

## वादळ

समुद्रावरील प्रचंड वादळाच्या एका चित्राला पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

इतके सुंदर चित्र कसे काढले याबद्दल समीक्षकानी चित्रकाराला विचारले तेव्हा त्याने सांगितले,

'समुद्रातील वादळाचे चित्र काढण्याच्या हेतूने मी समुद्र किनाऱ्यावरील एका गावात जाऊन राहिलो. एका रात्री वादळाला सुरुवात होताच मी तिथल्या होडीवाल्यांच्याकडे गेलो, पण त्या वादळात होडी काढण्यास कुठलाच नावाडी तयार होईना. अखेर खंबीर मनोवृत्तीचा एक नावाडी तयार झाला. त्याने मागितले तेवढे पैसे मी त्याला देऊ केले. आणि होडीतील शिडाला मला घट्ट बांधून घेतले.

वादळाचा वेग जसजसा वाढू लागला तसतशी होडी प्रचंड हेलकावे घेऊ लागली. लाटांनी माझे सारे अंग ओले चिंब होऊन गेले. कुठल्याही क्षणी मी समुद्रात फेकला गेलो असतो पण मला बांधून ठेवले असल्याने मी कसा-बसा जिवंत राहिलो. ते वादळ मी नुसतं पाहिलं नाही तर माझ्या सर्वांगात भिनून गेलं आणि घरी येताच हे चित्र रंगविले.

— इंद्रधनु

---

मध्यें धारवाडला जाऊन मॅट्रिक झालो. १९३६ मध्ये गोव्याच्या नॉर्मल स्कूलमधून टी. डी. ही पदविका घेतली.'

व्यवसाय ?

खरं सांगायचं तर वयाच्या सोळाव्या वर्षापासून मी पैसे मिळवायला लागलो. ३० साली मी दोन-तीन महिन्यांपुरती मुंबईच्या 'विविधवृत्त' साप्ताहीकात नोकरी केली. पण त्यांचं आमचं गोत्र जुळेलसं वाटेना. पगारही मिळाला नाही. म्हणून सोडली मग गोव्याला परतून शिक्षक झालो. वास्कोच्या सेंट जोसेफ स्कूलांत एक वर्ष, म्हापशाला एक वर्ष, पणजीला एक वर्ष, पणजीच्या पोर्तुगीज ट्रेनिंग कॉलेजमध्ये इंग्रजीचा अध्यापक. होतो. हाणजून गावी दिड वर्ष मुख्याध्यापक होतो. नंतर मडगांवला युनियन हायस्कूलात तीन वर्ष होतो. केप्याच्या सरकारी शाळेत पांच वर्षं होतो. म्हणजे १९३० ते १९४६ अशी सतरा वर्षं मी गोव्यात शिक्षकाचा व्यवसाय केला. नंतर गोमंतकाच्या स्वातंत्र्यपर्वांत उडी ठोकली नि गोवा सोडून मुंबई गाठली. ४६ ते ४८ पर्यंत मुंबईलाच होतो. मुंबईत पुन्हां थोडी मास्तरकीही केली. हिंदी शिकवलं. पण खरं काम संपादनाचं केलं. 'आमचा गोमंतक', 'आमचे गोंय' आणि 'प्रजेचा आवाज' ह्या नियतकालीकांचे मुंबईस संपादन केले. ४८ साली पुण्याला स्थलांतर केलं. शिवाजीनगर स्टेशनसमोर रानडे ब्लॉक्समध्ये बिऱ्हाड केलं. १९४८ ते ५४ पर्यंत पुण्यात फक्त लेखन आणि संपादन केलं. १ नोव्हेंबर १९५५ ला पुण्याच्या आकाशवाणीवर प्रोड्यूसर म्हणून लागलो तो थेट कालपरवापर्यंत म्हणजे पहा, कळायला लागल्यापासून गेली पंचेचाळीस वर्षं मी हे ना ते करुन पैसे उभे करीत आलो.

आपलं लग्न केव्हा झालं ?

नऊ मे १९३० रोजी. पत्नीचं नाव रुक्मिणी.

मुलंबाळं ?

दोन मुलगे. सहा मुली. धाकटा मुलगा इंजिनीअर असून अमेरिकेत हाऊस्टन येथे नोकरी करतो. मोठा मुलगा डॉक्टर आहे. त्यालाही अमेरिकेत नोकरीसाठी बोलावणे आले आहे. तोही आता थोड्याच दिवसात तिकडे जाईल. सर्व मुली चांगल्या स्थळी पडल्या असून आपापल्या संसारात तृप्त आहेत. जावई कर्तृत्ववान आहेत. आता प्रापंचिक जबाबदारीतून मी मोकळा झालो आहे.

तुम्ही काय वाचता ?

तसं पाहाता माझं वाचन कमीच आहे. मात्र जे थोडं वाचतो, त्याच्यावर खूप चिंतन करतो. ज्ञानेश्वरी वयाच्या अकराव्या वर्षी हाती आली. ती मात्र गेली

पन्नास वर्षं मनःपूर्वक वाचीत आलो आहे. विनोबांचं वाङ्मय उत्कृष्ट आहे. तेही अक्षर न् अक्षर वाचतो. विनोबाजी हे ऋषीच आहेत. वाचन कमी असलं तरी मी फार खोल जातों. पातंजली योगसूत्र सर्वांनीच वाचलं आहे. पण काव्यसाधना ही योगसाधनाच आहे हा त्यातला निष्कर्ष फक्त मी एकटचाने चिंतनाच्या बळावर काढला आहे. त्याचं विवरण मी परवा खारच्या संमेलनात केलं.

तुम्ही आयुष्यात कधी तडजोड केलीत ?

केली; त्याचं असं आहे की आयुष्यात essentials असतात आणि Non-essentials असतात. पैकी आयुष्यातल्या उच्च बाबींवर तडजोड करू नये. मामुली बाबींवर केल्याने काही बिघडत नाही. शुद्ध अभिजात कविता हे माझ्या आयुष्यातलं essential आहे. तिथे मी कालत्रयी compromise करणार नाही, केलेलंही नाही. इतर गोष्टी त्या मानाने कमी कमी essential होत जातात. तिथे तडजोड स्वीकारावी. मी अभिजात कविता लिहिली आणि प्रचारी लेखनही केलं. भान फक्त इतकंच ठेवलं की अभिजात कविता साहित्यात मोडते. प्रचारी पदं आणि लेख हे साहित्य नव्हे. आपण जमाखर्च लिहितो. का ? कारण त्याची गरज आहे. पण जमाखर्चाची खतावणी काही साहित्य नव्हे. हाच न्याय प्रचारी लेखनाला लावा. तेव्हा प्रथम essentials कोणती आहेत त्यांची priority लावली पाहिजे. ज्यामुळे तुमचा विकास होईल, तिथे तडजोड नसावी.

तुम्हाला तुमच्याबद्दल काय वाटतं ?

माझी श्रद्धा आहे की I am a man of destiny ! माझं 'महात्मायन' पुरं झालं की काश्मिर ते कन्याकुमारी माझं नाव गाजेल. तसा मी दैववानही आहे. सगळ्या गोष्टी माझ्याकडे आपल्या पायाने चालत आलेल्या आहेत. कविता मी माझ्या धुंदी-साठी लिहिली. सोळाव्या वर्षापासून मी डोळसपणे काव्य लेखन करतो आहे. त्या-बाबत माझं चौफेर कौतुक झालं. माझं कवितेचं पहिलं पुस्तक 'प्रतिभा' हे माझ्या गोवेकर मित्रांनी स्वखुषीने काढलं. पहिलं जाहीर काव्यगायन मी कोल्हापूरच्या साहित्यसंमेलनात तीस साली भास्करराव तांब्यांच्यासमोर केलं. त्यांनी तोंडभर कौतुक केलं. आशीर्वाद दिला. तो जन्मभर पुरतो आहे. नंतर दोन वर्षांनी बडोद्याच्या साहित्यसंमेलनात उत्कृष्ट काव्यरचनेबद्दल सुवर्णपदक मिळालं. पुढे भाऊसाहेब खांडे-करांचं प्रेम मिळालं. 'जीवनसंगीत' गाजलं. भले पहिली पंचवीस वर्षं, म्हणजे वयाच्या चाळीसीपर्यंत कवितालेखनाबद्दल मला दिडकी मिळाली नसेल, पण सर्व दिशांना रसिक मिळाले, चाहाते मिळाले. काकासाहेब कालेलकर तर माझे वडिल-धारेच आहेत. हे झालं कवितेविषयी. ठळक असं गद्यलेखनही मी केलं. तीन कादं-बऱ्या झाल्या. पैकी 'भावीण 'चं भाषांतर पाच भारतीय भाषात झालं. रवींद्रनाथां-वरच्या पुस्तकाला पाच सहस्र रुपयांचं पारितोषिक मिळालं. हे झालं मराठी; कोकणी साहित्यसेवा वेगळीच. मी नीतीग्रस्त व्यक्तिमत्त्वाने पछाडलेला नाही. नीती-

ग्रस्त ह्या भीतीच्या पोटी नीतिमत्तेचा बागुलबुवा करून बसतो. मला नीतिमंत व्यक्तिमत्त्व आवडतं. माणसाकडे स्वतःची म्हणून चिंतनसिद्ध, अनुभवसिद्ध, अशी नैतिक मूल्ये हवीत व ती त्याने स्वतःला आणि इतरांनाही समदृष्टीने लावावीत. जे स्वातंत्र्य मी भोगलं, ते मी इतरांनाही लुटू देईन. Personal God वर माझी श्रद्धा नाही. पण देव आहे. पावलोपावली मला त्याचा प्रत्यय येतो.

दैवाकडून भक्कम असलेले कवी बोरकर म्हणतात ते एका परीने खरंच आहे. एरव्ही, भगवंत बोरकराच्या पोटी कुडचडे नामक गोवेकरी खेड्यात जन्मलेलं बालक, 'महात्मायन' पुरं करण्याचं भव्य स्वप्न हृदयी धरेलच कसं? बोरकरांच्या मुखातून 'महात्मायना'तल्या शुभारंभाच्या ओव्यांचा खळाळ ऐकणं म्हणजे तन-मन रोमांचित करणारा एक अद्भूत अनुभव आहे. मी तो भोगला आहे म्हणून सांगतो. जुन्या मराठी भाषेची अशी अस्सल खानदानी मोडणी भेटणं केवळ दुर्लभ आहे. बोरकरांची, त्यांच्या खांद्यावरल्या पायघोळ उपरण्यासकट टिंगल करणं सोपं आहे. बोरकरांसारख्या चार ओळी लिहून पहा. पाठीचे मणके ढिले होतील; ब्रह्म आठवेल. पण लिहू शकतील त्यांना रसिकांच्या रूपाने ब्रह्म भेटेल आणि रसिकांच्या त्या तांड्यात पुन्हा बोरकर असतीलच. कारण हा माणूस चांगल्याला चांगलं म्हणत आला आहे. बालकवींच्यानंतर जरा वेगळचा अंगाची पण अस्सल ग्रामिण कविता नांदेडचा ना. धो. महानोर लिहित आहे, असा भरघोस पुकारा हात आखडून न घेता त्यांनी नुकताच केला. ह्याला नुसती दृष्टी असून चालत नाही. औदार्यही असावं लागतं. हात सैल असावा लागतो. दुसऱ्या शब्दात सांगायचं म्हणजे दानत असावी लागते. बोरकरांपाशी ती आहे. आणि म्हणूनच त्यांनी जिंकलं आहे. कवितेपेक्षा माणूस मोठा असतो असा खुद्द त्यांचाच निर्वाळा आहे! साठीची वेस ओलांडून कवी बोरीला गेले आहेत! बोरी गाव प्रसन्न आहे. सर्वत्र गारेगार आहे. गावाशेजारी जुआरी नदी आहे. देवळंरावळं आहेत. मऊ लाल रस्ते आहेत. माणसं बाळबोध आहेत. एकमेकांना जाणणारी आहेत. बोरीत त्यांची त्यांच्यासारखीच साधी दगडामातीची कोकणी घरं आहेत. त्यांच्यावर ऊन पडतं; पाऊस पडतो; चांदणं पडतं. बोरकरांच्या घरावरही ते पडेल.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

ब. मो. पुरंदरे

किंमत
प्रत्येकी
रुपये तीन

राजहंस प्रकाशन
पुणे.